# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

## // विशेष महासभा बैठकीचे कार्यवृत्त // (ऑनलाईन अॅपद्वारे)

**सभा क्रं. - २७** **दि.२६/०२/२०२१**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.२६/०२/२०२१ शुक्रवार रोजी दुपारी १२.०० वाजता सरदार वल्लभभाई पटेल टॉवर इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिग द्वारे) मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर. सौ.सोनवणे भारती कैलास यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या विशेष महासभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी ऑनलाईन पध्दतीने खालील मा.सदस्य सभेस उपस्थित होते.

**मा.सौ.सोनवणे भारती कैलास, महापौर तथा पिठासिन अधिकारी**

| | | |
|---|---|---|
| खडके सुनिल वामनराव, उपमहापौर | चौधरी मनोज सुरेश | सोनवणे सुरेखा सुदाम |
| नेरकर सरिता अनंत | भोईटे लताबाई रणजीत | ढेकळे सदाशिव गणपत |
| पोकळे दिलीप बबनराव | पाटील चंद्रशेखर शिवाजी | पाटील राजेंद्र झिपरु |
| सोनवणे कांचन विकास | कापसे मयुर चंद्रकांत | शेख शबानाबी सादीक |
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | कापसे प्रतिभा चंद्रकांत | नाईक प्रशांत सुरेश |
| शिंदे गायत्री उत्तम | देशमुख प्रतिभा गजानन | काळे रेश्मा कुंदन |
| बाविस्कर किशोर रमेश | सोनवणे सुरेश माणिक | आहुजा मनोज नारायणदास |
| सपकाळे रंजना भरत | बारी शोभा दिनकर | पाटील मिनाक्षी गोकुळ |
| कोल्हे प्रविण रामदास | शेख हसीनाबी शरिफ | सोनार रंजना विजय |
| सनकत चेतन गणेश | पाटील कुलभुषण विरभान | खडके विश्वनाथ सुरेश |
| सोनवणे मुकुंदा भागवत | भिल पार्वताबाई दामु | बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम |
| भंगाळे विष्णू रामदास | पाटील उषा संतोष | देशमुख सुन्नाबी राजु |
| सोनवणे राखी शामकांत | कोल्हे ललित विजय | शेख सईदा युसूफ |
| तायडे ज्योती शरद | बरडे नितीन मनोहर | पटेल इब्राहिम मुसा |
| लढ्ढा नितीन बालमुकुंद | बेंडाळे उज्वला मोहन | सोनवणे निता मंगलसिंग |
| काळे अमित पांडुरंग | राणे गायत्री इंद्रजित | सोनवणे विक्रम किसन |
| चौधरी मंगला संजय | जोशी अनंत हरिश्चंद्र | **स्विकृत सदस्य** |
| अॅड.हाडा शुचिता अतुलसिंह | तायडे सुरेखा नितीन | सोनवणे कैलास नारायण |
| भोळे सिमा सुरेश | चव्हाण ज्योती बाळासाहेब | मराठे राजेंद्र नारायण |
| काळे दिपमाला मनोज | मराठे जितेंद्र भगवान | चौधरी महेश रतन |
| सोनवणे अश्विन शांताराम | पाटील रेखा चुडामण | जैन भागचंद मोतीलाल |

सदर सभेस मा.आयुक्त, श्री.सतिश कुलकर्णी, अतिरीक्त आयुक्त , सौ.डॉ.विदया गायकवाड ,नगरसचिव श्री.सुनिल गोराणे, उपायुक्त श्री.शाम गोसावी, उपायुक्त श्री.प्रशांत पाटील, मुख्यलेखा परिक्षक श्री.संतोष वाहुळे, मुख्यलेखाधिकारी श्री.कपील पवार, सहा.आयुक्त श्री.पवन पाटील तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**मा.महापौर :-** महासभा क्रं. -२६ चे कामकाज संपलेले असल्याने नगरसचिव यांनी विशेष महासभेच्या विषय पत्रिकेवरील विषयांना सुरूवात करावी. विशेष महासभेचे कामकाज संपल्यानंतर राष्ट्रगीत घ्यावे.

**सभेस गणपूर्ती असल्याने मा.पिठासिन अधिकारी यांनी सभा सुरू करण्याचे निर्देश दिले.**

**नगरसचिव :-** सर्व सन्मा.सदस्यांचे स्वागत आहे. मा.महापौर यांचे निर्देशानुसार आयोजित महासभेमध्ये सर्व सन्मा.सदस्यांचे आलेले सर्व श्रध्दांजलीचे तसेच अभिनंदनाचे प्रस्ताव घेण्यात आलेले नाहीत. सदरचे प्रस्ताव हे पुढील महासभेत घेण्याबाबत मा.महापौर महोदया यांचे निर्देशानुसार विषय पत्रिकेवरील विषयांना सुरूवात करण्यात येत आहे.

**नगरसचिव :- विषय क्रं:- १)** जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) मौजे जळगांव शिवार स.नं.७७/२ या जमिनीतुन जाणाऱ्या १५.०० व २४.०० मी रुंद विकास योजना रस्त्याने बाधीत जमिनीचे भुसंपादना बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**ॲड . शुचिता हाडा :-** महापौर महोदया,जनता बँक आणि रोटरी आणि इतरही सामाजिक संस्था आहेत त्यांनी अर्ज दिलेले आहेत. त्यांचेपण या प्रस्तावामध्ये येथे नमुद आहे TDR बाबत विचारणा केली असता त्यास प्रतिसाद दिला नाही.प्रशासनाने त्यांना पुन्हा एकदा विचारणा करावी.आणि त्यांचा नकार असेल तर तसे ते लेखी घ्यावं ते रेकॉर्डवर येवु द्याव. माझ तर येथे म्हणणे आहे की प्रशासनाने त्यांना TDR घेण्यासाठी कन्वेंस करायचा प्रयत्न करावा प्रशासनाने आणि त्याही नंतर अजुन येथे सभागृहाच्या लक्षात आणुन देवु ईच्छिते कि राज्य शासनाने ४ जानेवारी २०२० ला एक युनिफाईड डिसीआर लागू केलेला आहे. त्यानुसार जमिन संपादन करून जमिन मालकाला क्रेडीट बाँड ईश्यु करता येतात. तर आपण क्रेडीट बाँड ऐवजी ते टिडीआर घ्यायला तयार नसतील तर क्रेडीट बाँडचा प्रस्ताव पाठवावा. क्रेडीट बाँड घेण्यासाठी त्यांना उद्युक्त करावं आणि या सगळया संदर्भात त्यांचा नकार असेल तर ते सगळे लेखी रेकॉर्डवर घ्यावं त्यामुळे आजचा हा विषय अमान्य करण्यात येत आहे.प्रशासनाचा प्रस्ताव हा अमान्य करण्यात येत आहे. प्रशासनाला ही सुचना आहे की टिडीआर घेण्यासाठी उद्युक्त करणे किंवा क्रेडीट बाँड साठीचा प्रस्ताव त्यांना पाठवणे आणि त्यांचा जो काही निर्णय आहे तो लेखी येथे रेकॉर्डवर घेण्यात यावा त्यानंतर हा प्रस्ताव पुन्हा महासभेसमोर पाठवावा.

**श्री.कुलभुषण पाटील :-** सदर विषयाला माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.४०२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) मौजे जळगांव शिवार स.नं.७७/२ या जमिनीतुन जाणाऱ्या १५.०० व २४.०० मी रुंद विकास योजना रस्त्याने बाधीत जमिनीचे भुसंपादना बाबतचे प्रस्तावात जमिन मालक यांना टि.डी.आर. घेणेबाबत विचारणा केली मात्र त्यास जमिन मालक यांनी प्रतिसाद दिला नाही, असे नमुद आहे. तरी प्रशासनाने पुनश्च टि.डी.आर. बाबत जमिन मालक यांना विचारणा करावी. त्यांचा नकार असेल तर तो नकार लेखी घेण्यात यावा. टि.डी.आर. घेण्याबाबत त्यांना Convince करण्याचा प्रयत्न करावा. तसेच दि.४/०१/२०२० रोजी शासनाने uified DCR लागु केलेला आहे. त्यानुसार जमिन संपादन करुन जमिन मालकाला Credit Bond घेणेबाबत प्रस्ताव पाठवावा.

सबब प्रशासनाचा प्रस्ताव अमान्य करण्यात येत आहे. प्रशासनाने जमिन मालकास आधी टि.डी.आर. बाबत Convince करण्याचा प्रयत्न करावा तसे होत नसल्यास Credit Bond प्रस्ताव पाठवुन Credit Bond घेणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५९ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- ॲड. हाडा शुचिता अतुलसिंह**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:- २)** महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानाअंतर्गत (जिल्हास्तरीय) अग्निशमन अत्याधुनिक साहित्य व उपकरणे खरेदी कामी येणारा रक्कम रु.४९,८५,०००/- मात्रचा खर्च अग्निशमन सेवा बळकटीकरण जिल्हा वार्षिक योजना २०२०-२१ अंतर्गत अनुज्ञेय निधीतुन करणेस व सदरचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समिती यांचेकडेस पाठविणे कामी मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**मा.महापौर :-** नवनाथ भाऊ

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** प्रस्ताव मान्य आहे पण सदर या प्रस्तावामध्ये पिंप्राळा मधील प्रस्ताव अग्निशमन दलासाठी जी मागणी केलेली आहे कुलभुषण भाऊंनी ती याच्यामध्ये समाविष्ठ करण्यात यावे.ऐवढे माझे म्हणणे आहे. सदरचा विषय मान्य करण्यात यावा.

**श्री.किशोर बाविस्कर :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.४०३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, आयुक्त यांचे दि.११/०२/२०२१ रोजीच्या निर्देशानुसार अग्निशमन विभागाला अनुज्ञेय असलेल्या रु. ५०,००,०००/- निधी मधुन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.अशास-२०१०/प्र.क्र.१९९/नवि-२० दि.०१/०१/२०११ नुसार व्हेईकल माउंटेट बँक कॅब सिस्टीम (मोटर साईकल इंजिन पॉवर्ड ॲन्ड माऊंटेड वॉटर मिस्ट एक्सटींग्युशर हाय प्रेशर टाईप) सदर निधीतुन खरेदी करता येईल का या बाबत नपा शाखा जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव प्रशासन अधिकारी यांचेशी प्रत्यक्ष चर्चा केली असता उक्त शासन निर्णयानुसार महाराष्ट्र आग सुरक्षा अभियान (जिल्हास्तर) अंतर्गत अनुज्ञेय बाबी मध्ये मोटर सायकल नाही तरी सदर निधीमधुन व्हेईकल माउंटेट बँक कॅब सिस्टीम (मोटर साईकल इंजिन पॉवर्ड ॲन्ड माऊंटेड वॉटर मिस्ट एक्सटींग्युशर हाय प्रेशर टाईप) खरेदी करता येणार नाही. त्या बदल्यात अग्निशमन आणीबाणी सेवा विभागाला आवश्यक अत्याधुनिक साहित्य व उपकरणे खरेदी करणे कामी अग्निशमन सेवा बळकटीकरण जिल्हा वार्षिक योजना सन २०२०-२१ अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव अग्निशमन/आणीबाणी सेवा विभागाला अनुज्ञेय असलेल्या रु.५०,००,०००/- निधी मधुन बाबनिहाय अंदाजित खर्च व संख्या एस.एस.एस.असोसीएट नागपुर यांचेकडील अंदाजपत्रकासह खालील प्रमाणे,

| अ.क्र. | साहित्य व उपकरणाचे नांव | नग | प्रती नग अंदाजित किंमत | एकुण अंदाजित किंमत |
|---|---|---|---|---|
| १. | बॅक पॅक सिस्टीम (9 lit.Cap) | ०२ | ४,५०,०००/- | ९,००,०००/- |
| २. | फायर प्रॉक्सिमिटी सुट (PPE Kits) (साईज नुसार) | १५ | १,२५,०००/- | १८,७५,०००/- |
| ३. | स्मोक एक्झॉस्टर | ०२ | २,००,०००/- | ४,००,०००/- |
| ४. | पोर्टेबल ग्राऊंड वॉटर मॉनिटर | ०४ | २,००,०००/- | ८,००,०००/- |
| ५. | सिलेक्ट ओ. फ्लो नोझल | ०८ | २५,०००/- | २,००,०००/- |
| ६. | डोअर ब्रेकर | ०२ | १,५०,०००/- | ३,००,०००/- |
| ७. | सर्च लाईट | १० | ५,५००/- | ५५,०००/- |
| ८. | होज रॅम्प | १२ | २०,०००/- | २,४०,०००/- |
| ९. | होज बाईडींग मशीन | ०१ | ४५,०००/- | ४५,०००/- |
| १०. | थर्मल इमॅजिंग कॅमेरा | ०१ | ८०,०००/- | ८०,०००/- |
| ११. | बॉयलर सुट,ऑरेंज (साईज नुसार) | ३० | ३,०००/- | ९०,०००/- |
| अंदाजित खर्च एकूण रक्कम रुपये :- | | | | ४९,८५,०००/- |

उपरोक्तप्रमाणे अग्निशमन सेवा बळकटीकरण जिल्हा वार्षिक योजना सन २०२०-२१ अंतर्गत अनुज्ञेय निधीतुन बॅक पॅक सिस्टीम व इतर साहित्य खरेदी करणेसाठी येणारा अंदाजित रक्कम रुपये ४९,८५,०००/- मात्रचे खर्चास तसेच सदरचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समिती यांचेकडेस पाठविणे कामी मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच पिंप्राळा येथे अग्निशमन केंद्र सुध्दा बळकटीकरण करणेबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५९ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**अनुमोदक :- बाविस्कर किशोर रमेश**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ३)** दिन दयाल अंत्तोदय योजना / राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान अंतर्गत नागरी बेघरांना निवारा करीता मनपा मालकीची जागा उपलब्ध करण्याबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** सदर प्रस्ताव मान्य आहे परंतू प्रशासनाने योग्य ती जागा निवडावी आणि ते करावे जेणेकरून आपला जे बस स्टँडला जे निवारा आहे त्याचा सर्व सामान्यांना त्रास होणार नाही किंवा ही जागा अडचणीची ठरणार नाही अशा ठिकाणी महापालिकेने जागा शोधुन सदर विषय मान्य आहे.

**ॲड . शुचिता हाडा :-** सदरच्या प्रस्तावाला माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ४०४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, दिन दयाल अंत्तोदय योजना / राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान अंतर्गत नागरी बेघरांना निवारा करीता मा.आयुक्त तथा संचालक नगरपरिषद संचालनालय वरळी, मुंबई यांचे दि.२८/०१/२०२१ रोजीच्या व्हिडीओ कॉन्फरन्स बैठकीत दिलेल्या सूचनेनूसार सदर योजने बाबत जळगांव मनपास प्रस्ताव सादर करण्याचे सूचित केलेले आहे. आज रोजी जळगांव शहरात बेघरांचे संरक्षण केले असता १८९ लाभार्थी शहरी बेघर आढळुन आले तसेच एक बेघर निवारा ७७ क्षमता असलेला मनपा मालकीचा (नविन बस स्टॅण्ड जवळील) जागेत सुरु असुन सन २०२०-२१ करीता एक नविन निवारा सुरु करण्याचे उद्दीष्ट देण्यात आले आहे. या नविन निवारा करीता आज रोजी २५०० ते ३००० चौरस फुट हॉल अथवा बांधकामाची आवश्यकता असुन या बांधकासाठी येणारा खर्च १००% शासन अनुदान देणार आहे. त्या करीता नगररचना विभाग व बांधकाम विभाग यांनी सदर कामी जागा निश्‍चित करण्याचे आदेश आयुक्त,मनपा यांनी दि.१५/०२/२०२१ रोजी झालेल्या बैठकीत दिले. त्या नुसार नगररचना विभागाचे रचना सहाय्यक व शहर अभियंता यांनी सयुंक्तीक पाहणी करुन खालील प्रमाणे जागा प्रस्तावित केलेली आहे.

नविपेठ मधील नटवर टॉकीज मागील जागा जळगांव सि.स.नं.२११८/२ मनपा मालकीची असुन मंजुर विकास योजना (जुनी हद्द) नुसार अस्तीत्वातील शाळा जागेवर दर्शविलेली आहे. परंतु सदर भाग रहिवास विभागात समाविष्ट असुन जागेवर मनपाने नविन बांधकाम केलेली तळ, पहिला, दुसरा मजला ईमारत पूर्वी शाळे साठी वापरण्यात येत होती. परंतु आज रोजी मनपाचे शिक्षण मंडळ व इतर कार्यालय या पूर्व पश्‍चिम ईमारतीत आहेत. या ईमारती लगत असलेल्या उत्तर दक्षीण भागात तळ मजला व पहिला मजला नविन बांधकाम असुन सदर भाग मुक बधीर विदयालया करीता वापरासाठी संस्थेस दिलेला आहे. सदर जागा रेल्वे स्टेशन पासुन जवळ देखील आहे. या पूर्वीच्या बांधकामावर तिसरा मजला प्रस्तावित बांधकाम ८.५९ मीटर X २८.६६ मीटर + ३.०८ मीटर X ६ मीटर =२६४.६६ चौ.मीटर (२८४८ चौ.फुट) करुन घेणे योग्य होईल. आज रोजी सदर विभागाचे सर्वेक्षण नुसार २५०० ते ३००० चौ. फुट क्षेत्र बांधकामाची मागणी आहे. जागेवरील पूर्वीचे बांधकाम आज रोजी चांगल्या स्थितीत असल्याने दिन दयाल अंत्तोदय योजना / राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान अंतर्गत नागरी बेघरांना निवारा करीता सदर जागी नविन मजला प्रशासनाने प्रस्तावित केलेला आहे परंतू सदर ठिकाणी बेघरांना निवारा करीता बांधकाम करुन जागा न देता इतर ठिकाणी प्रशासनाने पर्यायी जागा निवडून ती देणेस मान्यता प्रदान करणेत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५९ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील कुलभुषण विरभान**

**अनुमोदक :- ॲड. हाडा शुचिता अतुलसिंह**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ४)** केंद्र शासनाच्या अमृत अभियानाअंतर्गत पाणी पुरवठा वाढीव व राहीलेल्या भागातील वितरण व्यवस्था टाकणेकामी अंदाजपत्रक रक्कम रु.३०,४५,४९,३९९/- मात्रला मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** सदर प्रस्ताव मान्य आहे .प्रशासनाचा विषय मान्य आहे.

**ॲड . शुचिता हाडा :-** सदर विषयांस माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.४०५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महानगरपालिकेने महासभा ठराव क्रं.३६६ दि.१९/१०/२०१६ नुसार अमृत अभियानात समाविष्ट होणेसाठी, योजना मान्य असल्याबाबत, योजनेच्या अनुषंगाने महानगरपालिकेचा स्वहिस्सा वित्त आयोगाच्या निधीतून व महानगरपालिकेच्या इतर उत्पन्नातून उभारणेस, ग्राहकांच्या नळ जोडणीवर मीटर बसविणेस, योजनेच्या उत्पन्न व खर्च स्वयंसंतुलित करण्यास, व केंद्र शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या मार्गदर्शक सुचना व आदेशाची अंमलबजावणी करण्यास मान्यता प्रदान केलेली आहे.

जळगाव महानगरपालिकेने योजनेचे अंदाजपत्रक तयार करणे, निविदा प्रक्रिया करणे, योजनेच्या कामावर पर्यवेक्षण व गुणवत्ता नियंत्रण, योजनेबाबत वेळोवेळी तांत्रिक सल्ला देणे, मार्गदर्शन करणेसाठी सुचनांनुसार प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची नेमणूक केलेली आहे. त्यानुसार या कामी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणुक केलेली आहे.

पाणी पुरवठा विषयक कामांमध्ये पाण्याच्या उंच टाकीस जोडणारी जलवाहीन्या, विविध भागात पाण्याच्या उंच टाक्या संख्या ०७, संप व पंप हाऊस संख्या ०२, पंपीग मशिनरी, वितरण वाहीन्या [HDPE, DI Total ६४४.३६ KM, (Replacement ४५८.४२ KM, New १८५.९४ KM)], दुरुस्ती कामे, योजनेचे संगणकीय पर्यवेक्षण, सोलर प्लॅन्ट ०.५ मेगावॅट या कामांचा समावेश आहे. सदर कामाची निविदा प्रक्रिया होवून सदर कामाचे कार्यादेश मे जैन इरीगेशन सि.लि. जळगांव यांना दि.१७/११/२०१७ रोजी दिलेले असून आजमितीस ८० टक्के काम पुर्ण झालेले आहे.

यापूर्वी मंजूर अंदाजपत्रकात प्रस्तावित वितरण व्यवस्थेचे कामास मान्यता मिळाल्यानंतर विकसित झालेले, राहीलेले भागांचे अंदाजपत्रक तयार करणे कामी स्वतंत्र सल्लागार नेमणूक करुन त्यांचे मार्फत अंदाजपत्रक तयार करुन घेणेस व मजीप्रा विभागास देय रकमेतून कामाचा मेहनताना अदा करणेकामी मजीप्रा विभागाने नाहरकत कळविली आहे. त्यानुसार महानगरपालिकेच्या सल्लागार सुचीवर सुचीबध्द असलेले द निसर्ग कन्स्ल्टंसी,नाशिक या सल्लागारास दि.२३/१०/२०२० रोजी कामाचे आदेश दिलेले होते. सल्लागार यांनी त्यांचे पत्र दि.२४/१२/२०२० नुसार महानगरपालिकेचे पाणी पुरवठा युनिट अभियंता यांचे समवेत झोन निहाय प्रत्यक्ष साईट पाहणी अंती सुधारीत सर्वेक्षणानुसार सर्व झोन मिळून एकत्रित १८० किलोमीटर लांबीची वितरण व्यवस्था प्रस्तावित केली आहे. त्यानुसार सविस्तर संकल्पन व मजीप्रा विभागाची चालू दरसुची सन २०२०-२०२१ नुसार रु.४४,१०,८०,९४५/- मात्र चे अंदाजपत्रक तयार करुन इकडेस सादर केलेले आहे. सदर अंदाजपत्रकाची तपासणी करणेकामी मजीप्रा विभागास दि.१२/०१/२०२१ रोजी सादर केलेले आहे. सदयस्थितीत मजीप्रामार्फत तपासणीचे काम सुरु आहे. छाननीतील प्राथमिक चर्चेनुसार सदर कामी प्रत्यक्षात कामावर जीएसटी कर व इतर शुल्कांसह रु.३०,४५,४९,३९९/- खर्च येणार आहे. सोबत खर्चाचा गोषवारा सोबत जोडलेला आहे.

आजमितीस मुळ योजनेत बदल झालेल्या बाबी/ अतिरीक्त बाबी ईत्यादीवर खालील प्रमाणे खर्च प्रस्तावित असुन कामे सुरु आहे.

| | |
|---|---|
| मुळ निविदेत बदल झालेल्या बाबींमुळे कमी झालेला / वगळण्यात आलेल्या बाबींवरील प्रस्तावित खर्च | रु.७७,१९,१७,४०८/- |
| आजपावेतो मंजूर करण्यात आलेल्या स्थापत्य कामांच्या अतिरीक्त बाबींवरील खर्च | रु.४०,१८,६१,५१०/- |
| आजेपावेतो मंजूर करण्यात आलेल्या विदयुत कामांच्या अतिरीक्त बाबींवरील खर्च | रु.१,१७,८०,३०७/- |
| एकुण अतिरीक्त बाबींवर होणारा खर्च | रु.४१,३६,४१,८१७/- |
| नवीन भाग / राहीलेल्या भागातील जलवाहीनी वर प्रस्तावित खर्च | रु.३०,४५,४९,३९९/- |
| मूळ अंदाजपत्रकातून आजतागायत मंजूर / प्रस्तावित बाबींवरील खर्च वजा जाता शिल्लक रक्कम | रु.५,३७,२६,१९२/- |

सदर कामी बदल झालेल्या व अतिरीक्त बाबींमुळे खर्चाचा गोषवारा उपरोक्त प्रमाणे असून वाढीव भागांचे वितरण व्यवस्था प्रस्तावित करुन देखील खर्चात व मूळ मंजूर अंदाजपत्रकीय रकमेत वाढ होणार नसल्याने सदर वाढीव भागांचे वितरण व्यवस्थेचे अंदाजपत्रक रक्कम रु. ३०,४५,४९,३९९/- मात्रला तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत अंतिम छाननी करुन पूढील कार्यवाही करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५९ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील कुलभुषण विरभान**

**अनुमोदक :- ॲड. हाडा शुचिता अतुलसिंह**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ५)** मेहरुण स्मशानभूमि स्वखर्चाने विकसीत करणेकामी कृष्णा पेक्टीन्स प्रा.लि.व इतर यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** सदरील विषय ५ नंबर ३८ नं. आणि ४९ नं हे सर्व विषय जवळपास सारखे असुन स्वनिधीतुन विकास कामांच्या संदर्भात आहेत तरी सदर विषय मान्य आहेत.

**नगरसचिव :-** कोणते विषय भाऊ

**श्री.कुलभुषण पाटील :-** ५ नंबर ३८ नं. आणि ४९ नंबर चे विषय

**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया विषय क्रं. ५ मेहरूण स्मशान भुमिमध्ये जे कृष्णा पेक्टींगस प्रा.लि.या संस्थेने स्वखर्चाने स्मशान भुमि विकास करण्याचा प्रस्ताव पाठविलेला आहे. या आधी आपण ४२ कोटींच्या माध्यमातुन ३७ लाख मेहरूण स्मशानभुमिच्या कामासाठी मंजुर केलेले आहेत.त्यामध्ये जे विकास कामं असतील ती विकास काम सोडुन त्या कामांना परवानगी देण्यात यावी.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** सदर विषयांस माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.४०६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मेहरुण स्मशानभूमीची अत्यंत दुरावस्था झाली असून सदर स्मशानभूमीत अत्यंविधीसाठी येणाऱ्या नागरीकांना बसण्याची व्यवस्था, शौचालय, मुतारीची व्यवस्था, छोटेसे गार्डन, स्मशानभूमीत वॉचमन कॅबीन, अंत्यविधीसाठी लागणारे ओटे, रस्ते कॉक्रींटीकरण व पेव्हर ब्लॉक बसविणे, शांतीमंत्रासाठी साऊंड सिस्टीम बसविणे तसेच गाडया पार्कीगची व्यवस्था करणे इत्यादी कामे करुन सदर स्मशानभूमी स्वखर्चाने विकसीत करणे कामी कृष्णा पेक्टीन्स प्रा.लि.व इतर यांनी केलेल्या मागणीनूसार मनपाचे अटी-शर्तीस बंधनकारक राहून मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच स्मशानभुमीत आपल्या मार्फत विकसीत करण्यात येणाऱ्या कामांना आपल्या परिवारातील व्यक्तींचे नावे देणेस सुध्दा मान्यता देण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर स्मशानभूमी विकसीत करणेकामी यापूर्वी कोणासही दिली गेली नसलेबाबत खात्री करुन घ्यावी तसेच सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५९** **प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील राजेंद्र झिपरु**

**अनुमोदक :- ढेकळे सदाशिव गणपत**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ६)** मुक्ताईनगर जळगांव गट नं.२८ मध्ये बांधण्यात आलेल्या बगीच्यातील हॉल विविध कार्यक्रमासाठी मिळणेकामी अध्यक्ष, जागृती महिला मंडळ बहुउद्देशिय संस्था, मुक्ताईनगर,जळगांव यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**मा.महापौर :-** चंद्रशेखर भाऊ

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** माझे अनुमोदन आहे.

**नगरसचिव :-** सुचक कोण आहेत.

**श्री.चेतन सनकत:-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.४०७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जागृती महिला मंडळा मार्फत वर्षभरात संक्रांतीचे कार्यक्रम, आरोग्य शिबीर, भजन स्पर्धा, बालसंस्कार शिबिर, होली मिलन, प्रौढ शिक्षण, डोळे व दंत तपासणी शिबीर, स्त्रीभृणहत्ये विषयी जागृती, अंधश्रध्दा निर्मुलन व अनेक सांस्कृतिक कार्यक्रम, शैक्षणिक, सामाजिक, अध्यात्मीक, सत्कार समारंभ इत्यादी कार्यक्रम घेण्यात येतात तसेच मंडळाची मासिक सभा जागे अभावी प्रत्येक सदस्यांच्या घरी घ्यावी लागते, त्यामध्ये बऱ्याच अडचणी येतात. मंडळात महिलांसाठी विविध कार्यक्रम घेतले जातात, कार्यक्रम घेतांना देखील अडचणी येतात. मंडळास जागे अभावी उक्त कार्यक्रम घेणेस अडचणी येत असल्याने जागृती महिला मंडळ बहुउद्देशिय संस्था,मुक्ताईनगर,जळगांव यांनी मागणी केल्यानूसार मुक्ताईनगर जळगांव गट नं.२८ मध्ये झालेल्या

बगीच्यातील हॉल जागृती महिला मंडळ बहुउद्देशिय संस्था,मुक्ताईनगर,जळगांव यांना कार्यक्रमासाठी मनपाचे अटी-शर्तीस बंधनकारक राहून देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर हॉल यापूर्वी कोणासही दिला गेला नसलेबाबत खात्री करुन घ्यावी तसेच सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५९ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- सनकत चेतन गणेश**

**अनुमोदक :- पाटील चंद्रशेखर शिवाजी**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ७)** प्रभाग क्रमांक ३ मधील सि.टी.सर्व्हे क्रं.३३४३ (सर्व्हे क्र.११५/१अ+११५/१अ/२) जुना खेडी रोड, स्वप्नशिल अपार्टमेंट समोरील मनपा मालकीची बखळ खुली जागा इच्छापुर्ती महादेव बहुउद्देशिय संस्था,जळगांव यांना विकसित करणेसाठी देणेबाबत मा.सभापती,महिला व बालकल्याण समिती, सौ.रंजना भरत सपकाळे यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**मा.महापौर:-** रंजनाताई

**सौ.रंजना सपकाळे :-** सदर प्रस्ताव मान्य आहे.

**मा.महापौर:-** प्रविणभाऊ

**श्री.कैलास सोनवणे :-** ७ नंबर आणि ८ सारखेच आहेत दोघही प्रस्ताव

**श्री.प्रविण कोल्हे :-** या विषयाला माझे अनुमोदन आहे.

**नगरसचिव :-** आदरणीय नितीन भाऊ प्रस्ताव मान्य आहे का

**श्री. नितीन लढ्ढा :-** हो मान्य आहे.

**नगरसचिव :-** आदरणीय रियाजभाई प्रस्ताव मान्य आहे का

**श्री.रियाज बागवान :-** हो मान्य आहे.

**नगरसचिव :-** विषय क्रं. ९

**श्री.कैलास सोनवणे :-** विषय क्रं. ९ नाही १२ नंबर घ्या साहेब.९ नं. १० नं. ११ नं मान्य करण्यात येत आहे. १२ नंबर घ्या त्यानंतर १३ , १४ , १५ , १६ सगळे सारखेच आहेत .आधी ते घ्या मग हे घेवु.

**नगरसचिव :-** विषयपत्रिकेनुसार घेता येतील.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मी काय म्हणतोय आप्पासाहेब सिरीयली घेवु द्या.

**श्री.कैलास सोनवणे :-** ठिक आहे घ्या साहेब

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.४०८ पारित करण्यात आला.**

प्रभाग क्रमांक ३ मधील सि.टी.सर्व्हे क्रं.३३४३ (सर्व्हे क्र.११५/१अ+११५/१अ/२) जुना खेडी रोड, स्वप्नशिल अपार्टमेंट समोरील मनपा मालकीची बखळ खुली जागा इच्छापुर्ती महादेव बहुउद्देशिय संस्था,जळगांव यांना विकसित करणेसाठी देणेबाबत मा.सभापती,महिला व बालकल्याण समिती, सौ.रंजना भरत सपकाळे यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

असा ठराव करण्यात येतो की,जळगांव शहरातील प्रभाग क्रमांक ३ परिसरात जळगांव शहर शिवार सि.टी.सर्व्हे क्रं.३३४३ (सर्व्हे क्र.११५/१अ+११५/१अ/२) जुना खेडी रोड, स्वप्नशिल अपार्टमेंट समोर महानगरपालिका मालकीची बखळ खुली जागा स्थित असुन सदर जागेचा परिसरातील नागरीकांना कोणत्याही प्रकारचा उपयोग होत नसुन सदर जागा विकसित करुन नागरीक, अबालवृध्दांना सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत वारंवार मागणी होत आहे.

करिता प्रभाग क्रमांक ३ जळगांव शहर शिवार सि.टी.सर्व्हे क्रं.३३४३ (सर्व्हे क्र.११५/१अ+११५/१अ/२) जुना खेडी रोड, स्वप्नशिल अपार्टमेंट समोरील महानगरपालिका मालकीची बखळ खुली जागा याच परिसरातील समाजउपयोगी कामे करणारी संस्था इच्छापुर्ती महादेव बहुउद्देशिय संस्था,जळगांव यांना विकसित करणे कामी मनपाचे अटी-शर्तीस बंधनकारक राहून देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर जागा यापूर्वी कोणासही दिली गेली नसल्याबाबत खात्री करुन घ्यावी तसेच प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५९ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- सपकाळे रंजना भरत**

**अनुमोदक :- कोल्हे प्रविण रामदास**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ८)** प्रभाग क्रमांक ३ मधील सि.टी.सर्व्हे क्रं.३४६४ (स.क्र.११६/१/१+२) योगेश्वर नगर गजानन पार्क परिसरातील मनपा मालकीची बखळ खुली जागा विकसित करणे कामी श्री वरद विनायक गजानन पार्क बहुउद्देशिय संस्था,जळगांव यांना देणेबाबत मा.सभापती,महिला व बालकल्याण समिती,सौ.रंजना भरत सपकाळे यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सौ.रंजना सपकाळे :-** सदर प्रस्ताव मान्य आहे.

**श्री.प्रविण कोल्हे :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.४०९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की,जळगांव शहरातील प्रभाग क्रमांक ३ जुने जळगांव परिसरात जळगांव शहर शिवार सि.टी.सर्व्हे क्रं. ३४६४ (स.क्र.११६/१/१+२) योगेश्वर नगर गजाजन पार्क परिसरात महानगरपालिका मालकीची बखळ खुली जागा स्थित असुन सदर जागेचा परिसरातील नागरीकांना कोणत्याही प्रकारचा उपयोग होत नसुन सदर जागा विकसित करुन नागरीक, अबालवृध्दांना सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत वारंवार मागणी होत आहे.

करिता प्रभाग क्रमांक ३ जळगांव शहर शिवार सि.टी.सर्व्हे क्रं. ३४६४ (स.क्र.११६/१/१+२) योगेश्वर नगर गजाजन पार्क परिसरातील महानगरपालिका मालकीची बखळ खुली जागा याच परिसरातील समाजपयोगी कामे करणारी संस्था श्री वरद विनायक गजानन पार्क बहुउद्देशिय संस्था,जळगांव यांना विकसित करणे कामी मनपाचे अटी-शर्तीस बंधनकारक राहून देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर जागा यापूर्वी कोणासही दिली गेली नसल्याबाबत खात्री करुन घ्यावी तसेच प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५९ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- सपकाळे रंजना भरत**

**अनुमोदक :- कोल्हे प्रविण रामदास**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ९)** प्रभाग क्रं.१२, नुतन अजिंठा सोसायटी मधील विविध ०३ कामे करणे कामी व त्यास येणारा एकूण रक्कम रु.५१ लक्ष मात्र चे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्या,सौ.उज्वला मोहन बेंडाळे यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** महापौर महोदया, सदरील विषय जे आहेत हे विषय नं. ९ विषय नं. १० , विषय नं. ११, विषय नं. १५ , विषय नं. १३, विषय नं. १७, विषय नं. १९ , विषय नं.२३ , विषय नं. २४, विषय नं. २५, विषय नं. २६ व २९ , विषय नं. ३० , ३१ , ३२ , ३३ , ३४ , ३७, ३९ ,४० , ४१ , ४२ ,४३ , ४५ , ४७ ,५०,५१ , ५२, ५३ आणि ५४ हे विषय जे आहे बांधकाम विभागाच्या संदर्भातील आहेत. सर्व सन्मा .सदस्यांनी त्यांच्या त्यांच्या प्रभागामध्ये विकास कामांसाठी निधी उपलब्ध व्हावा म्हणुन या सभेपुढे सर्व सन्मा.सदस्यांनी पत्र दिलेले आहेत.परंतू माझी प्रशासनाला विनंती आहे, महापौर महोदया आपल्याला विनंती आहे. सर्व सन्मा.सदस्यांच्या पत्रांचा विचार करावा परंतु सदर कामांना आवश्यक असलेला निधी मंजुर होणेसाठी सदरचा प्रस्ताव हा जवळपास ६० ते ७० कोटी रुपयांचे हे प्रस्ताव आहेत हे सर्वच्या सर्व प्रस्ताव शासनाच्या नगरविकास विभागाकडे सादर करण्यात यावे.

नगरविकास विभागाकडुन ज्यावेळेस या सर्व कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात येईल त्यानंतर प्रत्यक्ष निधी प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात यावी. जेणेकरून त्या प्रभागातील सदस्यांना किंवा एखाद्या प्रभागामध्ये नागरीक निधीमुळे विकास कामांपासुन वंचित असतात तरी त्या प्रभागांमध्ये सर्व समसमान देण्यात यावा . आता याची नगरविकास विभागाकडुन प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर या सदरील प्रस्तावांचा विचार करण्यात यावा . एवढेच या ठिकाणी मी नमुद करतो प्रभागांचे लेखी घेण्यात यावे कारण कसे आहे. माझी या ऑनलाईन सभेमध्ये आपणांस विनंती आहे की हे विषय मान्य करण्यात यावे. हि माझी विनंती आहे

**श्री.अनंत जोशी :-** महापौर साहेबा , विषय क्रं. ४३ आणि ४४ हे दोन्ही वेगळे आहेत कुलभुषण भाऊ

**श्री.नितीन बरडे :-** महापौर साहेब

**श्री.अनंत जोशी :-** महापौर साहेबा , आपल्या ४२ कोटी मधील विषय नाहीये कुलभुषण भाऊ

**श्री.चेतन सनकत :-** कुलभुषण भाऊंनी मांडलेल्या विषयांना माझे अनुमोदन आहे.

**श्री.नितीन बरडे :-** महापौर साहेब विरोधी पक्ष नेता सुनिल भाऊ महाजन यांनी जो प्रस्ताव दिला आहे.

**मा.महापौर :-** बोला नितीन भाऊ

**श्री.नितीन बरडे :-** जो सुनिल भाऊ महाजन यांनी प्रस्ताव दिला आहे १५ नंबरचा विरोधीपक्ष नेते सुनिल महाजन यांनी जो प्रस्ताव दिलेला आहे. १ ते १० कामांचा त्याच्यात एक नाव ॲड करून घ्यायचे आहे. १ ते ११ करायचे आहे ते नगरसचिव साहेब सदर विषयामध्ये १ ते ११ करायचे आहे त्याच्यामध्ये मा.विरोधी पक्षनेते सुनिल भाऊंनी जो प्रस्ताव दिलेला आहे त्यामध्ये नगरसचिव साहेब १ ते ११ करायचे आहेत त्याच्यात .

**नगरसचिव :-** आदरणिय नितीनभाऊ प्रस्ताव मंजुर आहेत का

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो मंजुर आहे.

**नगरसचिव :-** रियाजभाई प्रस्ताव मंजुर आहेत का

**श्री.रियाज बागवान :-** हा हा मंजुर है.

**नगरसचिव :-** कुलभुषणभाऊ ते नंबर जरा हळु हळु बोला आम्हाला नोंद घ्यावी लागेल.

**श्री.कुलभुषण पाटील :-** विषय क्रं. ९ , १० , ११ ,१५ ,१६,१७,२२, २३, २४, २५, २६, २७, २९, ३०, ३१, ३२, ३३, ३४, ३७, ३९, ४०, ४१, ४२, ४३

**नगरसचिव :-** ४२ आणि ४३ चे काय म्हणत होते अनंतभाऊ

**श्री.कुलभुषण पाटील :-** ४२ , नाही नाही हा विषय क्रं. ४३ व ४४ हे बंटीभाऊंचा विषय आहे तो नाहीये तो वगळुन टाका . ४५,४७, ५०, ५१, ५२ , ५३ आणि ५४ हे विषय मान्य करण्यात यावे.

**ॲड . शुचिता हाडा :-** ५४ नंबरचा नाहीये.

**नगरसचिव :-** आपण सुचक आहेत का ?

**श्री.कुलभुषण पाटील :-** हो साहेब मी जी सुचना मांडली ती लक्षात आली आहे ना

**श्री.अनंत जोशी :-** गोराणे साहेब ४३ व ४४ नंबरचा विषय वेगळा आहे. ते विषय वेगळे घेण्यात यावे.

**श्री.प्रशांत नाईक :-** ४० नंबर चा विषय आहे प्रभाग क्रं. १८ चा

**श्री.नितीन लढ्ढा :-** ते आपण ठरावात नमुद करून घेवु

**श्री.चेतन सनकत :-** माझे अनुमोदन आहे.

**नगरसचिव :-** आदरणीय नितीन भाऊ प्रस्ताव मान्य आहे का यांच्या सुचनेप्रमाणे बरोबर ना

**श्री. नितीन लढ्ढा :-** हो मान्य आहे.

**नगरसचिव :-** आदरणीय रियाजभाई प्रस्ताव मान्य आहे का

**श्री.रियाज बागवान :-** हो मान्य आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ४१० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रभाग क्रं.१२, नुतन अजिंठा सोसायटी मध्ये खालील नमूद विविध ०३ कामे करणे कामी व त्यास येणारा एकूण रक्कम रु.५१ लक्ष मात्र चे खर्चास मान्यता मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्र.क्र.१२ मधील नुतन अजिंठा सोसायटी मधील रस्ते डांबरीकरण करणे. | रुपये १५ लक्ष |
| २ | प्र.क्र.१२ मधील नुतन अजिंठा सोसायटी मधील उतारावरील रस्ते | रुपये १४ लक्ष |

| | | |
|---|---|---|
| | कॉक्रींटीकरण करणे. | |
| ३ | प्र.क्र.१२ मधील नुतन अजिंठा सोसायटी मधील रस्त्यांच्या दोन्ही बाजुला बंदिस्त गटारींचे बांधकाम करणे. | रुपये २२ लक्ष |
| | एकूण रक्कम रु.- | रु.५१/- लक्ष |

प्रशासनाने सदर कामांसाठी लागणारा निधीबाबतचा प्रस्ताव शासनाचे नगरविकास विभागाकडेस सादर करावेत. सदर कामांसाठी नगरविकास विभागाकडुन प्रत्यक्ष निधी प्राप्त झाल्यावर ती कामे हातात घ्यावी व वार्षीक योजने अंतर्गत जिल्हा नियोजन मंडळातुन मिळणारे वार्षीक अनुदानातुन शहरातील प्रत्येक वार्डात समसमान वाटप करण्यात यावा.

प्रशासनाने सदर प्रकरणी आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५९ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील कुलभुषण विरभान**

**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**नगरसचिव :- विषय क्रं:- १०)** प्रभाग क्रं.०३, मध्ये विविध ०२ कामे नाविण्यपुर्ण योजने अंतर्गत करणे कामी व त्यास येणारा एकूण रक्कम रु.१७ लक्ष मात्र चे खर्चास मान्यता मिळणेबाबत मा.सभापती,महिला व बालकल्याण समिती,सौ.रंजना भरत सपकाळे यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** सदर प्रस्ताव मान्य आहे.

**श्री.चेतन सनकत :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ४११ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका प्रभाग क्रं.०३ मधील खालील नमुद कामे नागरीकांना विविध सोईसुविधा पुरविणे, शिक्षण सेवा पुरविणे कामी करुन घेणे गरजेचे असल्याने व याबाबत सदर परिसरातील नागरीकांकडून सदर कामांना लवकरात लवकर करणे बाबत सतत मागणी होत असल्यामुळे प्रभाग क्रं.०३ मध्ये खालील नमूद ०२ कामे नाविण्यपुर्ण योजने अंतर्गत करणे कामी येणाऱ्या एकूण रक्कम रु.१७/- लक्ष मात्र चे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्र.क्र.०३ मध्ये जिम साहित्य पुरविणे. | रुपये ०७ लक्ष मात्र |
| २ | प्र.क्र.०३ मध्ये विविध दोन ठिकाणी बालवाडी बांधकाम करणे. | रुपये १० लक्ष मात्र |
| | एकूण रक्कम रु:- | रुपये १७ लक्ष मात्र |

प्रशासनाने सदर कामांसाठी लागणारा निधीबाबतचा प्रस्ताव शासनाचे नगरविकास विभागाकडेस सादर करावेत. सदर कामांसाठी नगरविकास विभागाकडुन प्रत्यक्ष निधी प्राप्त झाल्यावर ती कामे हातात घ्यावी व वार्षीक योजने अंतर्गत जिल्हा नियोजन मंडळातुन मिळणारे वार्षीक अनुदानातुन शहरातील प्रत्येक वार्डात समसमान वाटप करण्यात यावा.

प्रशासनाने सदर प्रकरणी आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५९ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील कुलभुषण विरभान**

**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ११)** प्रभाग क्रं.०३ मध्ये विविध १ ते ८ कामे दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत करणे कामी व त्यास येणारा एकूण रक्कम रु.४,९९,९९,४९७/- मात्र चे खर्चास मान्यता मिळणेबाबत मा.सभापती,महिला व बालकल्याण समिती,सौ.रंजना भरत सपकाळे यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** सदर प्रस्ताव मान्य आहे.

**श्री.चेतन सनकत :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.४१२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका प्रभाग क्रं.०३ मधील खालील नमुद कामे नागरीकांना विविध सोईसुविधा पुरविणे, रहदारीस व वाहतुकीची सेवा उपलब्ध करणे कामी करुन घेणे गरजेचे असल्याने व याबाबत सदर परिसरातील नागरीकांकडून सदर कामांना लवकरात लवकर करणे बाबत सतत मागणी होत असल्यामुळे प्रभाग क्रं.०३ मध्ये खालील नमूद अ.नं. १ ते ८ कामे दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत करणे कामी येणाऱ्या एकूण रक्कम रु.४,९९,९९,४९७/- मात्र चे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्र.क्र.०३ खेडी शिवार स.नं.६२ मध्ये डांबरी रस्ता करणे. | रु.१२००००००.०० |
| २ | प्र.क्र.०३ खेडी शिवार स.नं.१/१ मध्ये योगा हॉल बांधणे. | रु.३९९९५०१.०० |
| ३ | प्र.क्र.०३ खेडी स.नं.६९ व दादा दरबार येथे आरसीसी गटार बांधणे. | रु.४९९९०००.०० |
| ४ | प्र.क्र.०३ शंकरराव नगर मध्ये आरसीसी गटार बांधणे. | रु.४००००००.०० |
| ५ | प्र.क्र.०३ विठोबा नगर मध्ये आरसीसी गटार बांधणे. | रु.१४१५२९६.०० |
| ६ | प्र.क्र.०३ खेडी आंबेडकर नगर मध्ये आरसीसी गटार बांधणे. | रु.१५८५७००.०० |
| ७ | प्र.क्र.०३ जुना खेडी रस्ता ते कावेरी हॉटेल ते महालक्ष्मी पार्क रस्ता तयार करणे. | रु.२००००००.०० |
| ८ | प्र.क्र.०३ तानाजी मालुसरे नगर, मेस्को माता नगर, दिनकर नगर येथे कॉक्रीट रस्ते करणे. | रु.२०००००००.०० |
| | एकूण रक्कम रु.- | रु.४,९९,९९,४९७/- |

प्रशासनाने सदर कामांसाठी लागणारा निधीबाबतचा प्रस्ताव शासनाचे नगरविकास विभागाकडेस सादर करावेत. सदर कामांसाठी नगरविकास विभागाकडुन प्रत्यक्ष निधी प्राप्त झाल्यावर ती कामे हातात घ्यावी व वार्षीक योजने अंतर्गत जिल्हा नियोजन मंडळातुन मिळणारे वार्षीक अनुदानातुन शहरातील प्रत्येक वार्डात समसमान वाटप करण्यात यावा.

प्रशासनाने सदर प्रकरणी आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५९** **प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील कुलभुषण विरभान**

**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**नगरसचिव :- विषय क्रं:- १२)** जळगांव मनपा हद्दीत गुंठेवारी विकास अधिनियमा अंतर्गत बांधकाम परवानग्या देणेस मुदतवाढ देणेबाबत मा.सभापती,महिला व बालकल्याण समिती, सौ.रंजना भरत सपकाळे यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया,जळगांव शहरातील मेहरूण परीसरामध्ये मोठ्या प्रमाणात गुंठेवारी ही जागा आहे आणि या जागेमध्ये परिसराच्या नागरीकांनी वस्त्या जवळजवळ १० ते १५ वर्षापासुन त्यांनी बांधुन झालेल्या आहेत आणि महापालिकेकडुन त्यांना घरपट्टी जी आहे मालमत्ता कर आपण एकपट जी असते त्याच्या दोनपट आपण दंडाचे बिल त्यांना पाठवत असतो त्याच्यामुळे त्यांना तिनपट हा मालमत्ता कर द्यावा लागतो म्हणुन ही गुंठेवारी जी आहे आपण नियमित केली तर नागरीकांना जो आज भुर्दंड बसतोय तो बंद होईल आणि महापालिकेची जी दंडाची वसुली आहे ती पण होईल आणि महापालिकेची जी थकबाकी आहे ती वसुल होईल तरी आपण ही गुंठेवारी जी आहे ती आपण नियमित करावी.

**सौ.रंजना सपकाळे :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मुदत वाढ द्यावी. मुदत वाढ देण्यात यावी.
**मा.महापौर :-** रंजनाताई
**श्री.कुलभुषण पाटील :-** सदरील प्रस्ताव मान्य आहे. पुढचा विषय घ्या.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.४१३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहरातील विविध परिसरातील खडे प्लॉट (गुंठेवारी) नियमाकुल करणे कामी जळगांव शहर महानगरपालिकेमार्फत प्रशासनाकडून दिनांक ३१ डिसेंबर २०१९ पर्यंत मुदत देण्यात आलेली होती. तद्नंतर सदर प्रकरणी पुढील कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही. सदर मुदतीत सुमारे ४० टक्के नागरीकांनी सदर गुंठेवारी नियमीत केलेले असून किमान ६० टक्के नागरीकांचे यासंबंधी कामे बाकी आहेत.

करीता येणाऱ्या आर्थिक वर्षात मुदत वाढ दिल्यास महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने शहरातील खडे प्लॉट (गुंठेवारी) नियमाकुल करणे कामी मुदतवाढ देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५९** **प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- पाटील राजेंद्र झिपरु**
**अनुमोदक :- सपकाळे रंजना भरत**

**नगरसचिव :- विषय क्रं:- १३)** नेरी नाका मुख्य स्मशानभुमी येथे महासभा ठराव क्रं.३५३ दि.१६/१२/२०२० नुसार माफक दरात अत्यंविधीकरिता जळावू लाकडे व जागा उपलब्ध करुन देण्याबाबत मा.सभापती,महिला व बालकल्याण समिती, सौ.रंजना भरत सपकाळे यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.
**सौ.रंजना सपकाळे :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.
**श्री.किशोर बाविस्कर :-** माझे या विषयाला अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.४१४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका महासभा ठराव क्र.३५३ दिनांक १६/१२/२०२० अन्वये शहरातील शिवाजी नगर स्मशान भुमीमध्ये अंत्यविधी करणेसाठी माफक दरात जळाऊ लाकडे उपलब्ध करुन देण्यासाठी मक्तेदार यांना शुल्क आकारुन तेथे जागा उपलब्ध करुन देण्यास मान्यता प्रदान करुन कार्यवाही करण्यात आलेली आहे.

महासभा ठराव क्र.३५३ दिनांक १६/१२/२०२० प्रमाणे नेरीनाका मुख्य स्मशानभूमी मध्ये प्रेत जाळण्यासाठी जळाऊ लाकूड उपलब्ध करणेसाठी पुष्कळ समस्या निर्माण होत आहेत. त्याठिकाणी लोकांना जळाऊ लाकूड वेळेवर उपलब्ध होत नसल्याने लोकांना जळाऊ लाकूड घेणेकरिता बाहेर जावे लागते. करिता नागरीकांची गैरसोय होवू नये तसेच त्यांना अत्यंत वाजवी दरात लाकूड उपलब्ध करुन देणेकामी श्री.प्रल्हाद शंकर कोळी, रा.खेडी ता.जि.जळगांव यांना म.न.पा. मालकीच्या नेरीनाका मुख्य स्मशानभूमी मध्ये अंत्यविधीसाठी लागणारे जळाऊ लाकुड ठेवणे करीता १५ x ३० चे जागेवर शेड उभारणे कामी ११ महिन्याच्या करारावर माफक दरात मनपाच्या अटी-शर्तीनुसार भाडे तत्वाने जागा उपलब्ध करुन देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

श्री.प्रल्हाद शंकर कोळी यांनी सदर स्मशानभूमीमध्ये प्रेत जाळण्यासाठी लागणारे जळाऊ लाकूड हे रक्कम रु.१५००/- मात्र घेऊन नागरीकांना उपलब्ध करुन दयावे व सदर दरपत्रकाचा फलक स्मशानभूमीत दर्शनी भागात लावणेत यावा.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेशा प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५९** **प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- सपकाळे रंजना भरत**

**अनुमोदक :- बाविस्कर किशोर रमेश**

**नगरसचिव :- विषय क्रं:- १४)** विकास दुध केंद्र सुरु करणेकरिता परवानगी मिळणेबाबत सौ.कल्पना प्रकाश चौधरी,व इतर ०७ (सात) नागरीकांचे मा.महापौर यांचेकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**मा.महापौर :-** उज्वलाताई

**सौ.उज्वला बेंडाळे :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**श्री.किशोर बाविस्कर :-** सदर विषयांस माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.४१५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, सौ.कल्पना प्रकाश चौधरी,व इतर ०७ (सात) नागरीकांचे अर्जानुसार खाली नमूद केलेल्या जागेत दुध बुथ केंद्र सुरु करणेस खालील अटी-शर्तीस बंधनकारक राहून मान्यता प्रदान करण्यात येत आहे. यापूर्वी दुध विकास केंद्र चालविणेस महासभा ठराव क्रं.२५२ दि.११/०२/२०२० मध्ये नमूद केल्याप्रमाणे अटी-शर्ती सदर दुध बुथ धारकांना सुध्दा लागू राहतील.

| अ.नं. | नांव | दुध बुथ केंद्राचे ठिकाण |
|---|---|---|
| १ | कल्पना प्रकाश चौधरी | चंदुअण्णा नगर, एच.पी.गॅस एजन्सीचे भिंतीस लागुन पुर्वेकडील बखळ जागेत |
| २ | स्वाती चंद्रशेखर शिंपी | ख्वाजामिया चौक |
| ३ | राजश्री प्रशांत जगताप | विवेकानंद नगर, गट नं.१४९/१ड जवळ |
| ४ | किशोर त्र्यंबक सपकाळे | हायवे क्रं.६ एम.जे.कॉलेज जवळ, अग्रवाल हॉस्पीटलच्या बाजुला |
| ५ | जगदीश भालचंद्र नागला | हरिओम नगर, कानळदा रोड, जळगांव |
| ६ | स्वप्नील श्रीकांत साकळीकर | नवीपेठ, नटवर टॉकिज जवळ, जेडीसीसी बँक झाडा शेजारी, जळगांव. |
| ७ | संजय झावरु सुर्यवंशी | मनपा शाळा क्र.२८ येथे दायमा शाळेच्या मागे |
| ८ | प्रमोद सुरेश सोनवणे | घाणेकर चौक, प्रकाश मेडीकल जवळील दत्त मंदीरा शेजारील जागेत |

**<u>अटी-शर्ती :.</u>**

१) दुध बुथ केंद्रामध्ये दुध व दुधजन्य पदार्थ, बिस्कीट,खारी, टोस्ट व पाणी बोटल विक्रीस ठेवता येतील त्या व्यतिरिक्त तंबाखू, गुटका, सिगारेट तसेच अंमली पदार्थ व इतर पदार्थ आढळल्यास मुदतवाढ रद्द करण्यात येईल.

२) दुध बुथ केंद्रधारकाने दुध बुथ केंद्रापासुन कोणत्याही प्रकारे रहदारीस अडचण निर्माण होणार नाही या बाबतचे प्रमाणपत्र शहर वाहतुक विभागाकडून प्राप्त करुन म.न.पा.कडेस देणे बंधनकारक राहिल.

३) उपरोक्त ०८ नमुद विकास दुध बुथ धारकांना ३ वर्षासाठी परवानगी देण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५९** **प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- बेंडाळे उज्वला मोहन**

**अनुमोदक :- बाविस्कर किशोर रमेश**

**नगरसचिव :- विषय क्रं:- १५)** जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत म.न.पा.च्या नगरोत्थान निधी मधुन एकूण १ ते १० कामे करणे व त्याकामी येणारा एकुण रक्कम रु. ४,६८,९२,९६८/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत मा.विरोधी पक्षनेता, श्री.सुनिल सुपडू महाजन यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.
**श्री.कुलभुषण पाटील :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.
**श्री. चेतन सनकत :-** माझे या विषयाला अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.४१६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत म.न.पा.च्या नगरोत्थान निधी मधुन प्रभाग क्रं.१५, १८, ५, १२, ८, १९ मधिल खालील नमूद अ.नं. १ ते १० कामे करणेस व त्याकामी येणारा एकुण रक्कम रु. ४,६८,९२,९६८/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्रं. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रु. |
|---|---|---|
| १. | प्रभाग क्रं.१५ मधील महादेव मंदिर ते कंजरवाडा पर्यंतच्या तसेच नाल्याच्या दोन्ही साईड ने संरक्षण भिंत बांधणे. | रु. ७५,००,०००/- |
| २. | प्रभाग क्रं.१८ मध्ये श्रीराम कन्या शाळे मागील नाल्यास पश्चिम साईड ने संरक्षण भिंत बांधणे. | रु. ७५,००,०००/- |
| ३. | प्रभाग क्रं.१५ मधील सर्व्हे नं.२५९ जय भवानी नगर मधील रस्ते खडीकरणासह डांबरीकरण करणे. | रु. ४९,७५,०००/- |
| ४. | प्रभाग क्रं.५ अंतर्गत गांधी नगर, भवानी पेठ, जोशी पेठ, इ. परिसरात ठिकठिकाणी डांबरी रस्ते तयार करणे. | रु. ६६,००,०००/- |
| ५. | प्रभाग क्रं.१२ अनंत हौ. सोसायटी, श्याम सुंदर कॉलनी व समर्थ कॉलनी येथे आर.सी.सी. गटर व स्लॅब कल्व्हर्ट बांधणे. | रु. १९,०३,८४४/- |
| ६. | प्रभाग क्रं.८ मध्ये गट नं.१०१ निमखेडी शिवार येथे रस्ते डांबरीकरण करणे. | रु. ४०,६९,९३४/- |
| ७. | प्रभाग क्रं.१२ मध्ये रामदास कॉलनी मधील नाल्यावर ठिकठिकाणी पुल बांधणे तसेच स्लॅब कल्व्हर्ट बांधणे व नाल्याला संरक्षण भिंत बांधणे. | रु. ६०,००,०००/- |
| ८. | प्रभाग क्रं.१२ मधील विदयुत नगरी ते श्रध्दा कॉलनी पर्यंत चा रस्ता कॉंक्रीटचा करणे. | रु. २३,४४,१९०/- |
| ९. | प्रभाग क्रं.१८ सर्व्हे नं.२५४/३ मेहरुण शिवार खुल्या जागेस संरक्षण भिंत बांधणे पेव्हर ब्लॉक बसविणे व ओपन जिम चे साहीत्य पुरविणे. | रु. २०,००,०००/- |
| १०. | प्रभाग क्रं.१९ राम नगर व सदाशिव नगर मध्ये रस्ते डांबरीकरण करणे. | रु. ४०,००,०००/- |
| | एकूण रक्कम रु.- | रु. ४,६८,९२,९६८/- |

तसेच सभागृहातील चर्चेनूसार व सन्मा.सदस्य, श्री.नितीन मनोहर बरडे यांनी महापौर यांचेकडेस केलेल्या मागणीनूसार सदर प्रस्तावात खालील काम समाविष्ठ करणेस सुध्दा मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्रं. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रु. |
|---|---|---|
| ११. | प्रभाग क्रं.१२ मध्ये मेहरुण शिवार स.नं.५६१/१अ, १ ब धांडे नगर मधील रस्ते डांबरीकरण करणे. | रु.६४,५४,११२/- |

प्रशासनाने सदर कामांसाठी लागणारा निधीबाबतचा प्रस्ताव शासनाचे नगरविकास विभागाकडेस सादर करावेत. सदर कामांसाठी नगरविकास विभागाकडुन प्रत्यक्ष निधी प्राप्त झाल्यावर ती कामे हातात घ्यावी व वार्षीक योजने अंतर्गत जिल्हा नियोजन मंडळातुन मिळणारे वार्षीक अनुदानातुन शहरातील प्रत्येक वार्डात समसमान वाटप करण्यात यावा.

प्रशासनाने सदर प्रकरणी आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५९ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील कुलभुषण विरभान**

**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया सदरच्या नावाला आमचा विरोध आहे. हे मेहरूण गावाशी मिळत जुळत नांव आहे. भविष्यामध्ये उद्याच्या दिवशी मेहरूण गावाचे नांव मेहरूणीसा करायच या पध्दतीने होईल म्हणुन या नावाला आमचा विरोध आहे. तरी कृपया असे कुठलेही नांव देवु नये. ज्याच्यामुळे गावाच्या नावात बदल होईल.

**श्री.किशोर बाविस्कर :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** राजुभाऊ हा विषय वेगळा आहे. फक्त प्रवेशद्वाराला नांव द्यायचे आहे.

**श्री.रियाज बागवान :-** महापौर मॅडम , हा विषय वेगळा आहे तो विषय वेगळा आहे हा नामकरणचा विषय नाहीये. फक्त प्रवेशद्वारावर नांव द्यायचे आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया, नांव दुसरे कुठलेही असेल माझा सपोर्ट असेल या नावाला विरोध आहे.

**श्री.रियाज बागवान :-** महापौर मॅडम,

**मा.महापौर :-** ईबाभाऊ आवाजच येत नाहीये बरोबर तुमचा

**श्री.ईब्राहीम पटेल :-** भारतीय जनता पार्टीची समजुत झालेली आहे की ते नांव चेंज करताहेत. आम्ही नांव चेंज करत नाहीये.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब ईबा पटेल कोणत्याही याच्यामध्ये भारतीय जनता पक्षाला ओढायची काही गरज नाहीये. ज्यावेळेला ऑफलाईन बैठक राहील ना तेव्हा आपण समोरा समोर बोलु काय आहे ते रिकाम्या गोष्टी करायच्या नाही कुठेच सांगतोय मी

**श्री.अनंत जोशी :-** महापौर साहेबा बोलु का

**श्री.कैलास सोनवणे :-** सांगायचेच नाही .

**श्री.ईब्राहीम पटेल :-** फक्त प्रवेशद्वार उभारायचे आहे नामकरण नाहीये ना

**श्री.कुलभुषण पाटील :-** जो बोला ठिक है अब तो चुप बैठो.

**श्री.अनंत जोशी :-** महापौर साहेबा, मी बोलु का ?

**मा.महापौर :-** बोला बोला.

**श्री.अनंत जोशी :-** महापौर साहेबा हा जो प्रस्ताव आलेला आहे ना तो एमआयएम कडुन आलेला आहे. प्रवेशद्वाराला मेहरूणीसा यांचे नांव देण्यासाठी याची पार्श्वभुमि थोडक्यात सांगतो जी मी ऐकून आहे. आपल्या जळगांव शहरामध्ये एक विषय प्रचलित आहे. मेहरूणीसा खरच त्या ठिकाणी महिला होत्या त्यांच्या नावाचा अपगृहंश होता. मेहरूणीसा चे मेहरूण झालेले आहे.आता राजुभाऊंची शंका अशी आहे की, आज प्रवेशद्वाराला नांव देतील आणि उद्या मेहरूणचे नांव मेहरूणीसा करतील पण तशी काही खोलात जायची गरज नाही आणि तसे काही होवु देणार नाही. जळगांव शहराचे नागरीक पण नाही आणि मेहरूणचे नागरीक पण नाही. पण याला पार्श्वभुमि खरच आहे. ऐतिहासीक विषय आहे. त्याचे दाखले आहेत. मेहरूणीसा म्हणुन त्या ठिकाणी महिला होत्या. त्यांच्याच नावाने ते नामकरण झालेले आहे. याला मान्यता देणेस हरकत नसावी अस माझ म्हणण आहे. बाकी निर्णय आपण भजपवाले घेवु शकता.

**मा.महापौर :-** अप्पा काय करायच आहे हा विषय.

**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया, रद्द करण्यात यावा.
**श्री.कैलास सोनवणे :-** मेहरूण चा विषय आहे ना मेहरूणच्या नगरसेवकांना विचारा.तुम्ही चर्चा करा.
**नगरसचिव :-** विषय क्र.३६ च काय आहे.
**श्री.कुलभुषण पाटील :-** त्याचा डिसीजन बाकी आहे.
**नगरसचिव :** नाही नाही तस नाही, विषय सिरयली व्हायला पाहिजे ना.
**श्री.कुलभुषण पाटील :-** आता डिसीजन होणार नाही त्याच्यावर.
**श्री.कैलास सोनवणे :-** विषय रद्द करा. आता किती विषय बाकी आहे.
**नगरसचिव :**- विषय क्र.३६ सुचक किशोर बाविस्कर साहेब आहे ना.
**मा.महपौर :-** किशोर भाऊ बोला.
**श्री.चेतन सनकत :-** राजु भाऊ सुचक आहे. अनुमोदक कोण आहे.
**नगरसचिव :**- विषय क्र.३६ नामंजुर केलेला आहे.
**श्री.नितीन लढढा :-** आम्ही निषेद करतो त्यांचा.
**श्री.कैलास सोनवणे :-** पुढचा विषय घ्या.
**श्री.राजेंद्र पाटील :-** पुढचा विषय घ्या.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.४३७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव प्रभाग क्र.१८ जळगांव-मुंबई हायवे ममता हॉस्पिटल जवळ प्रवेशव्दाराची उभारणी करुन त्याचे “मेहरुणनिसा” असे नामकरण करणेबाबत आलेला प्रस्ताव नामंजूर करण्यात येत आहे.

**सर्वानुमते नामंजुर**

**अनुकूल मते :- ५९** **प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- पाटील राजेंद्र झिपरु**
**अनुमोदक :- बाविस्कर किशोर रमेश**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ३७)** प्रभाग क्र. ८ मधील विविध भागात जिल्हा वार्षीक योजने अंतर्गत दलितेत्तर योजना अंतर्गत रस्ते डांबरीकरण, सिमेंट कॉंक्रीट ट्रिमिक्स पध्दतीने रस्ता व गटार बनविणे कामी येणारा रक्कम रु.३,५४,८५,२००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.चंद्रशेखर शिवाजीराव पाटील यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.
**श्री.कुलभुषण पाटील :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.
**श्री. चेतन सनकत :-** माझे या विषयाला अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ४३८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रभाग क्र. ८ मधील खालील विविध भागात जिल्हा वार्षीक योजने अंतर्गत दलितेत्तर योजना अंतर्गत रस्ते डांबरीकरण, सिमेंट कॉंक्रीट ट्रिमिक्स पध्दतीने रस्ता व गटार बनविणे कामी येणारा रक्कम रु.३,५४,८५,२००/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.नं. | विकास कामे | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | प्रभाग क्र.८ मधील श्रीरामनगर, टिळकनगर, देवराम नगर, विठ्ठलवाडी, खोटेनगर, कृष्णापूरम, रामव्दार पार्क, फेडरेशन कॉलनी, मयुरेश्वर कॉलनी, ४० खोल्या, साई मंदिर परिसर, दादावाडी, व्दारका नगर व परिसरात डांबरीकरण, सिमेंट कॉंक्रिट ट्रिमिक्स पध्दतीने रस्ता व गटार बनविणे. | रु.३,५४,८५,२००/- |

प्रशासनाने सदर कामांसाठी लागणारा निधीबाबतचा प्रस्ताव शासनाचे नगरविकास विभागाकडेस सादर करावेत. सदर कामांसाठी नगरविकास विभागाकडुन प्रत्यक्ष निधी प्राप्त झाल्यावर ती कामे हातात घ्यावी व वार्षीक योजने अंतर्गत जिल्हा नियोजन मंडळातुन मिळणारे वार्षीक अनुदानातुन शहरातील प्रत्येक वार्डात समसमान वाटप करण्यात यावा.

प्रशासनाने सदर प्रकरणी आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५९ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील कुलभुषण विरभान**

**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ३८)** प्रभाग क्र. ८ मध्ये प्रेमनगर मधील श्री.सप्तश्रृंगी चॅरिटेबल ट्रस्ट तर्फे लोकवर्गणीतून प्रेमनगर प्रवेश स्वागत कमान उभारणेस परवानगी मिळणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.चंद्रशेखर शिवाजीराव पाटील तसेच अध्यक्ष, श्री.सप्तश्रृंगी चॅरिटेबल ट्रस्ट व परिसरातील नागरीक यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** तहकुब ठेवण्यात यावा.

**सौ.**प्रतिभा देशमुख :- अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** ठिक आहे. पुढचा विषय घ्या.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.४३९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रभाग क्र. ८ मध्ये प्रेमनगर मध्ये जाणाऱ्या रस्त्यावर श्री.सप्तश्रृंगी चॅरिटेबल ट्रस्ट व परिसरातील नागरीक यांना स्वखर्चाने प्रवेश स्वागत कमान उभारणेबाबत आलेला प्रस्ताव तहकूब करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५९ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील चंद्रशेखर शिवाजी**

**अनुमोदक :- देशमुख प्रतिभा गजानन**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ३९)** डी.पी.डी.सी. फंडातुन वॉर्ड क्र.१४ मध्ये विविध कामे करणे व त्याकामी येणारा एकूण रक्कम रु.१,२५,०५,५५५/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्या,सौ.सुरेखा सुदाम सोनवणे यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**श्री. चेतन सनकत :-** माझे या विषयाला अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.४४० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, नागरीकांच्या मागणीनूसार डी.पी.डी.सी. फंडातुन वॉर्ड क्र.१४ मध्ये खालील नमूद विविध कामे करणे व त्याकामी येणारा एकूण रक्कम रु.१,२५,०५,५५५/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.नं. | विकास कामे | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | प्रभाग क्र.१४ मेहरुण परिसरातील रामेश्वर कॉलनी, स्वामी समर्थ केंद्राजवळील मागील व पूढील गल्ली रस्ता कॉंक्रीटीकरण करणे व गटार बांधकाम करणे. त्याचप्रमाणे हनुमान मंदीर परिसरातील संपुर्ण रस्ता कॉंक्रीटीकरण करणे व गटार बांधकाम करणे. एकनाथनगर परिसरातील महादेव मंदीराचे समोरील रस्ता कॉंक्रीटीकरण व गटारींचे बांधकाम करणे. | रु.१,२५,०५,५५५/- |

प्रशासनाने सदर कामांसाठी लागणारा निधीबाबतचा प्रस्ताव शासनाचे नगरविकास विभागाकडेस सादर करावेत. सदर कामांसाठी नगरविकास विभागाकडुन प्रत्यक्ष निधी प्राप्त झाल्यावर ती कामे हातात घ्यावी व वार्षीक योजने अंतर्गत जिल्हा नियोजन मंडळातुन मिळणारे वार्षीक अनुदानातुन शहरातील प्रत्येक वार्डात समसमान वाटप करण्यात यावा.

प्रशासनाने सदर प्रकरणी आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५९** **प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील कुलभुषण विरभान**

**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ४०)** सन २०२०-२१ च्या मनपा बजेट मधील तरतुदीस अनुसरुन प्र.क्र.१८ अंतर्गत मिल्लत नगर, मलिक नगर, कय्युम देशमुख नगर, ईक्बाल कॉलनी, मिल्लत हायस्कुल मागील भाग सर्व्हे नंबर ०९ मधील रस्ते डांबरीकरणे करणे व त्याकामी येणारा एकूण रक्कम रु.१,७०,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.प्रशांत सुरेश नाईक यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**श्री. चेतन सनकत :-** माझे या विषयाला अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ४४१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, दि.२६/०२/२०२१ विशेष महासभा विषय क्रं.२६ जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत सन २०२०-२१ च्या मनपा बजेट मधील तरतुदीस अनुसरुन प्रस्तावित विकास कामे अ.क्र. ०१ ते ९८ एकुण रक्कम रुपये ६८,२१,६४,८४३/- मात्रच्या कामांचा विषय समाविष्ट करण्यात आलेला आहे.

सदर दिनांक २६/०२/२०२१ रोजीच्या आयोजित विशेष महासभा विषय क्रं.२६ एकुण अ.क्र.०१ ते ९८ प्रस्तावित विकास कामांमध्ये प्र.क्र.१५ अंतर्गत मिल्लत नगर, मलिक नगर, कय्युम देशमुख नगर, ईक्बाल कॉलनी, मिल्लत हायस्कुल मागील भाग सर्व्हे नंबर ०९ मधील रस्ते डांबरीकरणे करणे या कामांचा समावेश करणेस व त्याकामी येणारा एकूण रक्कम रु.१,७०,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर कामांसाठी लागणारा निधीबाबतचा प्रस्ताव शासनाचे नगरविकास विभागाकडेस सादर करावेत. सदर कामांसाठी नगरविकास विभागाकडुन प्रत्यक्ष निधी प्राप्त झाल्यावर ती कामे हातात घ्यावी व वार्षीक योजने अंतर्गत जिल्हा नियोजन मंडळातुन मिळणारे वार्षीक अनुदानातुन शहरातील प्रत्येक वार्डात समसमान वाटप करण्यात यावा.

प्रशासनाने सदर प्रकरणी आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५९** **प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील कुलभुषण विरभान**

**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ४१)** प्रभाग क्र.१० मध्ये वृंदावन कॉलनी ते ईद्रदेव नगरला जोडणाऱ्या गट नं.१८७/१, १८२ या रस्त्यावर लहान २ पुलांचे व संरक्षण भिंतीचे बांधकाम करणे व त्याकामी येणारा एकूण रक्कम रु. १ कोटी मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्या, सौ.शोभा दिनकर बारी यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**श्री. चेतन सनकत :-** माझे या विषयाला अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ४४२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रभाग क्र.१० मध्ये वृंदावन कॉलनी ते ईद्रदेव नगरला जोडणाऱ्या गट नं.१८७/१, १८२ या रस्त्यावर लहान २ पुलांचे व संरक्षण भिंतीचे बांधकाम करणे व त्याकामी येणारा एकूण रक्कम रु. १ कोटी मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर कामांसाठी लागणारा निधीबाबतचा प्रस्ताव शासनाचे नगरविकास विभागाकडेस सादर करावेत. सदर कामांसाठी नगरविकास विभागाकडुन प्रत्यक्ष निधी प्राप्त झाल्यावर ती कामे हातात घ्यावी व वार्षीक योजने अंतर्गत जिल्हा नियोजन मंडळातुन मिळणारे वार्षीक अनुदानातुन शहरातील प्रत्येक वार्डात समसमान वाटप करण्यात यावा.

प्रशासनाने सदर प्रकरणी आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५९ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील कुलभुषण विरभान**

**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ४२)** दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्र.१० अंतर्गत गट क्र.२१९ नागवंशी बुध्द विहार शेजारी अदयावत व्यायाम शाळा बांधणे व त्याकामी येणारा एकूण रक्कम रु.१०,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.सुरेश माणिक सोनवणे यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**श्री. चेतन सनकत :-** माझे या विषयाला अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.४४३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की,जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.१० चा परिसर हा दाट वस्तीचा परिसर असून येथे नागरीकांसह विशेष: युवकांसाठी व्यायाम, योगा करणे करीता कुठलीही व्यवस्था नसल्यामुळे सदर परिसरात अदयावत व्यायाम शाळा उभारणे कामी नागरीकांकडून वारंवार मागणी होत आहे.

करीता उपरोक्त कारणास्तव या कामी पारित शासन निर्णयान्वये दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्र.१० अंतर्गत गट क्र.२१९ नागवंशी बुध्द विहार शेजारी अदयावत व्यायाम शाळा बांधणे व त्याकामी येणारा एकूण रक्कम रु.१०,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर कामांसाठी लागणारा निधीबाबतचा प्रस्ताव शासनाचे नगरविकास विभागाकडेस सादर करावेत. सदर कामांसाठी नगरविकास विभागाकडुन प्रत्यक्ष निधी प्राप्त झाल्यावर ती कामे हातात घ्यावी व वार्षीक योजने अंतर्गत जिल्हा नियोजन मंडळातुन मिळणारे वार्षीक अनुदानातुन शहरातील प्रत्येक वार्डात समसमान वाटप करण्यात यावा.

प्रशासनाने सदर प्रकरणी आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५९ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील कुलभुषण विरभान**

**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ४३)** जळगांव शहरातील स्व.पुष्पलता बेंडाळे चौकातील झाशीच्या राणी लक्ष्मीबाई यांच्या पुतळयाचे सुशोभिकरण करणेबाबत मा.गटनेते,शिवसेना,श्री.अनंत हरिश्चंद्र जोशी यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढढा :-** मंजुर.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** गोराणे साहेब, विषय क्र.४० चा जो विषय आहे.

**श्री.अनंत जोशी :-** साहेब, गोराणे साहेब, विषय क्र.४३ फक्त इतका हा विषय नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** ते तीन विषय आहे.

**श्री.अनंत जोशी :-** त्यात तीन विषय आहे. आणि बाकीचे उरलेले दोन विषय ही महत्वाचे आहे. प्रशासनाचा खुलासा येऊ द्या. त्यांची काय पॉलिसी आहे त्याबाबत मला बघु द्या.

**श्री.कैलास सोनवणे :- विषय क्र.४० होऊन गेल्यावर काय बोलत आहे ईबा भाई.**

**मा.महापौर :-** ईबा भाई झाला तो विषय क्र.४० मंजुर.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** ठिक आहे.

**श्री.अनंत जोशी :-** पहिल्याच वाचन गोराणे साहेबांनी केलेल आहे. त्याच्यात दुसरा विषय असा दिलेला आहे. शहरातील राष्ट्रपुरुष,महापुरुष, संत महात्मा, यांच्या स्मारकाच्या जवळपास, अवतीभवती संरक्षण भिंतीवर अथवा संरक्षण जाळीवर कुठल्याही प्रकारचे फलक, भिंतीपत्रक, स्टिकर लावण्यास कठोर बंदी लावण्याबाबत ठराव करण्यात यावा. विशेषत: महाराणा प्रताप यांच्या स्मारकाजवळ, विदरुपीकरण टाळुन महापुरुषांचा सन्मान राखाण्यास नागरीकांना बाध्य करावे. हा दोन नंबरचा आहे त्याच कारण असा आहे. आता याला ठरावाची काय गरज आहे आपल्या मनात येऊ शकतो. कारण की ऑलरेडी आपल्या नियमांमध्ये आहे सगळ, त्याच अनुकरण केल जात नाही. आपण जर बघाल तर शहरामध्ये ठिक ठिकाणी ज्याला जस वाटेल जिथे वाटेल तस त्याच्यात राजकीय मंडळी पण आहेत, व्यवसायीक पण आहेत, सामाजिक संस्था पण आहे. ज्या जिथे वाटेल तेथे बॅनर लावत सुटले आहे. पोस्टर लावत सुटले, भिंतीपत्रक लावत सुटले. कमीत कमी महापुरुषांच, सादु महात्मांचा आपण मान राखला पाहिजे. त्यांच पावित्र आपण राखला पाहिजे. आपल्याकडुन किरकोळ वसुली विभागातुन जेव्हा परवानगी दिली जाते त्यांना या गोष्टींचा काटेकोर पालन झाल पाहिजे. पण तस होतांना दिसत नाही. म्हणुन महासभेपुढे आणावा लागल की, ठराव करुन संबंधीत अधिकाऱ्यांना, त्या विभागाला आपण आदेशीत केल पाहिजे. त्याच कठोर रित्या पालन झाल पाहिजे. यातला तिसरा विषय आहे. शहरातील राष्ट्रीय पुरुष, महापुरुष, संत महात्मा यांचे स्मारक पुतळे दर महिन्याला पाण्याने धुवन स्वच्छ करणेबाबत तसेच परिसर कायम स्वच्छ असावे असा ठराव संबंधित विभागास आदेशित करण्यात यावे.पुतळयांची अवस्था पाहीली तर आता ठिक आहे आता परिस्थिती तशी आहे. सगळी कडे धुळ आहे रस्त्यांचे काम चालु आहेत, ड्रेनेजचे काम चालु आहेत, अमृतचे  कामं चालु आहेत. पण हा विषय आपण गांभीर्याने घेतला पाहीजे याच्यामध्ये आपण त्यांच कुठेतरी मान राखला पाहीजे. राष्ट्रपुरषांचा , महापुरूषांचा त्यासंबंधी आपण केले पाहीजे आणि तसा ठराव केला पाहीजे.याच्यामध्ये शहरातील पुतळयांचे पावित्र्य अबाधित राहावे म्हणुन धार्मिक स्थळांच्या अवती भोवतीच्या २०० मीटर अंतर परिसरात कुठलेही पोस्टर , फलक , भित्ती पत्रक लावण्यास मज्जाव करणेबाबतचा ठराव करणेस विनंती. सदरहु ठराव करून संबंधित विभागाला सक्त ताकीद यात देण्यात यावी. यानंतर जर असे घडले तर संबंधित अधिकारी / कर्मचारी हे योग्य त्या कार्यवाहीस पात्र असतील असे देखील या ठरावात नमुद करण्यात यावे. कारण की आता हे सगळे आपल्याकडे आहे पण याचे पालन केले  जात नाही आणि तीच चुक आपल्या प्रशासनाकडुन होते व कर्मचाऱ्यांकडुन होते आणि आपण जर बघाल तर धार्मिक स्थळांच्या अवतीभोवती जाहीरातीचे फलक असतील, खाजगी फलक असतील, भिंतीवर असतात मंदिराच्या , मंदिरासमोर असतात हे कुठेतरी बंद झाले पाहीजे. किमान त्या मंदिराच्या किंवा धार्मिक स्थळाच्या अवतीभोवती कमीत कमी २०० मीटरच्या अंतरावर हे व्हायला नको परवानगी देतांना याची काळजी घेतली पाहीजे.

**सौ.गायत्री राणे :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** योग्य आहे, सुचना योग्य आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.४४४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहरातील स्व.पुष्पलता बेंडाळे चौकातील झाशीच्या राणी लक्ष्मीबाई यांच्या पुतळयाचे सुशोभिकरण करणेस, सरंक्षण भिंत नव्याने करुन स्मारकाच्या अवतीभोवती शोभेची झाडे लावुन तसेच योग्य पध्दतीने रोषणाई करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच शहरातील राष्ट्रपुरुष महापुरुष, संत महात्मा, यांच्या स्मारकांच्या जवळपास अवतीभोवती संरक्षण भिंतीवर अथवा संरक्षण जाळीवर कुठल्याही प्रकारचे फलक भितीपत्रक स्टीकर, पोस्टर लावणेस कठोर बंदी करण्यात येत आहे. (विशेषत: महाराणा प्रताप यांच्या स्मारका जवळ) विद्रुपीकरण टाळुन महापुरुषांचा योग्य सन्मा राखण्यास नागरीकांना बाध्य करणेत यावे. याबाबत तात्काळ कार्यवाही प्रशासनाने करावी.

प्रशासनाने संबंधीत विभागामार्फत शहरातील राष्ट्रपुरुष महापुरुष, संत महात्मा, यांचे स्मारक पुतळे दर दोन महीन्यात पाण्याने धुवून स्वच्छ करण्यात यावे तसेच परिसर देखील कायम स्वच्छ ठेवावा.

शहरातील धार्मीक स्थळांचे पावीत्र्य अबादीत राहावे म्हणून धार्मीक स्थळांच्या अवतीभोवतीच्या २०० मी. परिसरात कुठलेही फलक, पोस्टर, स्टीकर, भितीपत्रके लावणेस मज्जाव करणेत येत आहे. (उदा :- ओंकारेश्वर मंदीर परिसर) याबाबत संबंधीत प्रशासनास सक्त ताकीद देण्यात येत आहे. यानंतर ही उपरोक्तप्रमाणे कार्यवाही न झाल्यास संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांचेवर प्रशासनाने त्वरीत कठोर कार्यवाही करावी.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५९ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- जोशी अनंत हरिश्चंद्र**

**अनुमोदक :- राणे गायत्री इंद्रजित**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ४४)** सागर पार्क येथे फलक बंदी करणेबाबत मा.गटनेते,शिवसेना,श्री.अनंत हरिश्चंद्र जोशी यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.अनंत जोशी:-** प्रशासनाचा प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**सौ.गायत्री राणे :-** अनुमोदन आहे.

**श्री.अनंत जोशी :-** महापौर साहेबा मला याबाबत बोलायच आहे.

**मा.महापौर :-** बोला भाऊ.

**श्री.अनंत जोशी :-** आता इतके वर्ष सागर पार्क येथे झालेले नव्हते , आता इतके वर्ष जे नागरीक , व्यवसायिक , उद्योजक किंवा राजकीय मंडळी याबाबतीत छोटे मोठे गल्लीतले पुढारीपण आणि मोठे राजकीय मंडळी पण आतापर्यंत तिथे बॅनर कुठे लावायचे तिथे संरक्षण भिंत नव्हती आता तिथे जाळी नव्हती त्या सागर पार्कला, तो पर्यंत त्यांची जाहिरात कुठे व्हायची. अचानक आज तेथे कंपाऊंडवॉल झाल, जाळी झाली तर त्याठिकाणी बॅनर लावले जातात. त्या ठिकाणी मॅचेस खेळतात, त्याठिकाणी उपक्रम राबविले जातात. काही महोत्सव असेल. ते सगळे त्या जागेच वापर करतात. आणि आपल्या मनपाच्या शहरोच बोलत नाहीये मी एकत्रितच बोलतोय आपल्या कामाचा दर्जा आणि गुणवत्ता काय असते हे आपल्या सगळयांनाच माहित आहे.ती सागर पार्कची भिंत म्हणजे ती काही एखाद्या किल्ल्याची अभेद्य भिंत नाहीये. ती जाळी दोन चार महिन्यात रस्त्यावर पडलेली दिसेल सागरपार्कची ते क्रीकेट मॅचेस वाले आपण बघितले असेल आता नाईट टुर्नामेंट चालु होत्या आता अनेक लोकांच्या , संस्थाच्या पुर्ण अशी जाळी भरून टाकतात मोठमोठ्या बॅनरने त्या जाळीला बॅनर बांधतात जेव्हा आपण सागर पार्कला बुकींग घेतो. त्यावेळेस ती अट तुम्ही टाकुन दिली पाहीजे की कुठलेही फलक लावायचे नाही . तुम्ही टेन्ट वाला बोलवा तिथे पाईप टाकुन त्यावर लावा . त्या जाळीवर किंवा संरक्षक भिंतीवर लावायचे नाही. हे आपण परवानगी देतांना त्यात नमुद केले गेले पाहीजे अशी माझी विनंती आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** प्रशासनाने दखल घ्यावी.

**नगरसचिव :-** आदरणीय नितीनभाऊ मंजुर आहे .

**श्री.नितीन लढ्ढा :-** होय मंजुर आहे.

**नगरसचिव :-** रियाजभाई मंजुर आहेना

**श्री.रियाज बागवान :-** होय मंजुर आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ४४५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, अनेक दशकानंतर सागर पार्क विकास कामांना चालना मिळालेली असुन गेल्या काळात याठिकाणी सरंक्षक भिंतीचे काम देखील झाले आहे. सदरहु भिंत डबर कामात केली असुन त्यावर जाळी बसविण्यात आली आहे. सदरहु काम झाल्यापासुन याठिकाणी होणाऱ्या स्पर्धा व इतर कार्यक्रम आयोजित करणारे तसेच शहरातील राजकीय पक्षाचे कार्यकर्ते सामाजिक संस्था तसेच व्यावसायिक जाहीराती म्हणुन देखील या जाळीवर मोठमोठे बॅनर, जाहीरात फलक लावुन सागर पार्क चे पर्यायाने शहराचे विद्रुपीकरण करु लागले आहे. तसेच यामुळे सदरहु कंम्पाऊंड वॉलच्या जाळीची आता पासुनच दुर्दशा सुरु झालेली आहे. याबाबत तातडीने निर्णय न घेतल्यास काही दिवसातच सदरहु कंम्पाऊंड

उध्दवस्त झालेले जळगांव करांना दिसेल. याकरीता सागर पार्क येथे फलक लावणेस बंदी करणेस मान्यता देण्यात येत आहे. प्रशासनाने संबंधीत विभागास याबाबत सक्त ताकीद देवून ठरावाची काटेकोरपणे अंमलबजावणी करणेचे निर्देश दयावेत.

प्रशासनाने सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५९** **प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- जोशी अनंत हरिश्चंद्र**

**अनुमोदक :- राणे गायत्री इंद्रजित**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ४५)** जिल्हा वार्षीक योजने अंतर्गत म.न.पा.च्या नागरी दलित्तेतर वस्ती सुधारणा योजना / नगरोत्थान योजने अंतर्गत प्रभाग क्रं.१२ मध्ये विविध १ ते ५ ठिकाणी रस्ते डांबरीकरण करणे व त्याकामी येणारा एकूण रक्कम रु.३,३६,००,६१५/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत मा.गटनेते,शिवसेना,श्री.अनंत हरिश्चंद्र जोशी यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**श्री. चेतन सनकत :-** माझे या विषयाला अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ४४६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जिल्हा वार्षीक योजने अंतर्गत म.न.पा.च्या नागरी दलित्तेतर वस्ती सुधारणा योजना / नगरोत्थान योजने अंतर्गत प्रभाग क्रं.१२ मध्ये खालील नमूद विविध १ ते ५ ठिकाणी रस्ते डांबरीकरण करणे व त्याकामी येणारा एकूण रक्कम रु.३,३६,००,६१५/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रु. |
|---|---|---|
| १. | प्रभाग क्रं.१२ मधील मनिषा कॉलनी गणपती नगर मेहरुण स.नं.४२८, ४२९,४३२,४३३,४४१ अ मधील रस्ते डांबरीकरण करणे. | रु.१,००,५१,५१८/- |
| २. | प्रभाग क्रं.१२ मधील जय नगर ओंकारेश्वर मंदीर परिसर मेहरुण स.नं.४९१,४९२,४९३ मधील रस्ते डांबरीकरण करणे. | रु.६१,२६,४४८/- |
| ३. | प्रभाग क्रं.१२ मधील रामदास कॉलनी, वर्धमान नगर मेहरुण स.नं.४९४,४३१ मधील रस्ते डांबरीकरण करणे. | रु.७०,५९,७४०/ |
| ४. | प्रभाग क्रं.१२ मधील प्रभात कॉलनी, समर्थ कॉलनी, विदया नगर मधील रस्ते डांबरीकरण करणे. | रु.७५,८७,४१५/ |
| ५. | प्रभाग क्रं.१२ मधील अनंत हौ.सोसायटी व लगतचा परिसर मधील रस्ते डांबरीकरण करणे. | रु.२७,७५,४९४/ |
| | एकूण रक्कम रु.- | रु.३,३६,००,६१५/- |

प्रशासनाने सदर कामांसाठी लागणारा निधीबाबतचा प्रस्ताव शासनाचे नगरविकास विभागाकडेस सादर करावेत. सदर कामांसाठी नगरविकास विभागाकडुन प्रत्यक्ष निधी प्राप्त झाल्यावर ती कामे हातात घ्यावी व वार्षीक योजने अंतर्गत जिल्हा नियोजन मंडळातुन मिळणारे वार्षीक अनुदानातुन शहरातील प्रत्येक वार्डात समसमान वाटप करण्यात यावा.

प्रशासनाने सदर प्रकरणी आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५९** **प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील कुलभुषण विरभान**

**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ४६)** रामेश्वर कॉलनी मधील जलकुंभास "श्री.संत गाडगे बाबा महाराज" असे नामकरण करणेबाबत सन्मा.सदस्य, श्री.गणेश किसन सोनवणे यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सौ.सुरेखा सोनवणे :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**श्री. सदाशिव ढेकळे :-** माझे या विषयाला अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.४४७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिकेमार्फत रामेश्वर कॉलनी मध्ये नविन उभारणेत आलेल्या जलकुंभास "श्री.संत गाडगे बाबा महाराज जलकुंभ " असे नामकरण करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर जलकुंभास यापूर्वी कोणाचेही नांव दिले गेले नसल्याबाबत खात्री करुन घ्यावी. तसेच सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५९ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- सोनवणे सुरेखा सुदाम**

**अनुमोदक :- ढेकळे सदाशिव गणपत**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ४७)** जिल्हा वार्षीक योजने अंतर्गत म.न.पा. नाविण्यपुर्ण योजना निधी मधुन प्रभाग क्रं.१९ मधील गट नं.२७४/२ मंगलपुरी मध्ये ओपनस्पेसला वॉल कंम्पाऊंड करणे त्याकामी येणारा एकूण रक्कम रु.२० लक्ष मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.गणेश किसन सोनवणे यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**श्री. चेतन सनकत :-** माझे या विषयाला अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.४४८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जिल्हा वार्षीक योजने अंतर्गत म.न.पा. नाविण्यपुर्ण योजना निधी मधुन प्रभाग क्रं.१९ मधील गट नं.२७४/२ मंगलपुरी मध्ये ओपनस्पेसला वॉल कंम्पाऊंड करणे व त्याकामी येणारा एकूण रक्कम रु.२० लक्ष मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर कामांसाठी लागणारा निधीबाबतचा प्रस्ताव शासनाचे नगरविकास विभागाकडेस सादर करावेत. सदर कामांसाठी नगरविकास विभागाकडुन प्रत्यक्ष निधी प्राप्त झाल्यावर ती कामे हातात घ्यावी व वार्षीक योजने अंतर्गत जिल्हा नियोजन मंडळातुन मिळणारे वार्षीक अनुदानातुन शहरातील प्रत्येक वार्डात समसमान वाटप करण्यात यावा.

प्रशासनाने सदर प्रकरणी आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५९ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील कुलभुषण विरभान**

**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ४८)** सोना-सुनंदिनी नगर बहुउद्देशिय संस्थेस सर्व्हे क्र.५०५/२ मधील ओपनस्पेस जागा सामाजिक उपक्रमाकरिता देणेबाबत अध्यक्ष, सोना-सुनंदिनी नगर बहुउद्देशिय,संस्था,जळगांव यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.किशोर बाविस्कर :-** अमान्य आहे हा विषय

**श्री.नितीन लढ्ढा** :- रद्द आहे.

**नगरसचिव :-** अनुमोदक कोण

**श्री.चेतन सनकत :**- माझे अनुमोदन आहे .

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.४४९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, सोना-सुनंदिनी नगर बहुउद्देशिय संस्थेस सर्व्हे क्र.५०५/२ मधील ओपनस्पेस जागा सामाजिक उपक्रमाकरिता देणेबाबत आलेला प्रस्ताव नामंजूर करण्यात येत आहे.

**सर्वानुमते नामंजुर**

**अनुकूल मते :- ५९ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- बाविस्कर किशोर रमेश**

**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ४९)** हरिबोल बहुउद्देशीय संस्थेस जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील मेहरुण शिवार गट नं.२७४/ब मधील भुखंड उदयान स्वखर्चाने विकसित करणेकामी देणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.गणेश किसन सोनवणे व अध्यक्ष, हरिबोल बहुउद्देशीय संस्था, जळगांव यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.प्रशांत नाईक :**- प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**श्री.विक्रम सोनवणे :-** या विषयास मान्यता आहे.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** अनुमोदन आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** पुढचा विषय घ्या.

**नगरसचिव :**- आदरणीय नितीनभाऊ मंजुर आहे .

**श्री.नितीन लढ्ढा :-** होय मंजुर आहे.

**नगरसचिव :**- रियाजभाई मंजुर आहेना

**श्री.रियाज बागवान :-** होय मंजुर आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.४५० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, हरिबोल बहुउद्देशीय, संस्था, मेहरुण या संस्थेमध्ये गट नं.२७४/ब मधील सर्व महिला कार्यकारणी व सभासद आहेत. सदर संस्थेमार्फत बचतगटाचे माध्यमातुन विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. संस्थेचे माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबविणे व उदयान विकसीत करावयाचे असून सदर उदयानात वृक्षारोपण करुन वृक्ष लागवड व संवर्धन करण्याची जबाबदारी संस्थेची असून उदयान विकसित करणेसाठी लागणारा संपूर्ण खर्च सदर संस्था करणार असल्याने म.न.पा.च्या अटी-शर्तीस बंधनकारक राहून हरिबोल बहुउद्देशीय संस्थेस जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील मेहरुण शिवार गट नं.२७४/ब मधील भुखंड उदयान स्वखर्चाने विकसित करणेकामी देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर भुखंड यापूर्वी कोणत्याही संस्थेस दिला गेला नसल्याबाबत खात्री करुन घ्यावी तसेच सदर प्रकरणी मनपा अधिनियम/शासन निर्णय/आदेश प्रमाणे आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५९ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- सोनवणे विक्रम किसन**

**अनुमोदक :- ढेकळे सदाशिव गणपत**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ५०)** वार्षीक नाविण्यपुर्ण, नागरी दलितेत्तर, तसेच नगरोत्थान योजने अंतर्गत प्रभाग क्रं.२ मध्ये विविध १ ते ६ कामे करणे व त्याकामी येणारा एकूण रक्कम रु.१४५ लक्ष मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.किशोर रमेश बाविस्कर यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**श्री. चेतन सनकत :-** माझे या विषयाला अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.४५१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, वार्षीक नाविण्यपुर्ण, नागरी दलितेत्तर, तसेच नगरोत्थान योजने अंतर्गत प्रभाग क्रं.२ मध्ये खालील नमूद विविध १ ते ६ कामे करणेस व त्याकामी येणारा एकूण रक्कम रु.१४५ लक्ष मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | प्रभाग क्रं.२ स्वामी नारायण गल्ली येथे पेव्हर ब्लॉक किंवा कॉंक्रीटीकरण करणे. | रु.२०,००,०००/- |
| २. | प्रभाग क्रं.२ रतिलाल सपकाळे यांची गल्ली येथे पेव्हर ब्लॉक किंवा कॉंक्रीटीकरण करणे. | रु.२५,००,०००/ |
| ३. | प्रभाग क्रं.२ धनसिंग सोनवणे यांचे चक्की जवळील गल्ली येथे पेव्हर ब्लॉक किंवा कॉंक्रीटीकरण करणे. | रु.२५,००,०००/ |
| ४. | प्रभाग क्रं.२ चैत्राम भालेराव ते प्रशांत साळुंखे येथे संपुर्ण गल्ली डांबरीकरण करणे. | रु.३०,००,०००/ |
| ५. | प्रभाग क्रं.२ संदीप सपकाळे यांचे दोन्ही गल्ली मध्ये पेव्हर ब्लॉक किंवा कॉंक्रीटीकरण करणे. | रु.२०,००,०००/ |
| ६. | प्रभाग क्रं.२ शालील अप्पा यांचे घरामागील ते हरिओम नगर पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | रु.२५,००,०००/ |
| | एकूण रक्कम रुपये :- | रु.१,४५,००,०००/ |

प्रशासनाने सदर कामांसाठी लागणारा निधीबाबतचा प्रस्ताव शासनाचे नगरविकास विभागाकडेस सादर करावेत. सदर कामांसाठी नगरविकास विभागाकडुन प्रत्यक्ष निधी प्राप्त झाल्यावर ती कामे हातात घ्यावी व वार्षीक योजने अंतर्गत जिल्हा नियोजन मंडळातुन मिळणारे वार्षीक अनुदानातुन शहरातील प्रत्येक वार्डात समसमान वाटप करण्यात यावा.

प्रशासनाने सदर प्रकरणी आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५९ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील कुलभुषण विरभान**

**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ५१)** वार्षीक नाविण्यपुर्ण, नागरी दलितेत्तर, तसेच नगरोत्थान योजने अंतर्गत प्रभाग क्रं.२ मध्ये विविध १ ते ५ कामे करणे व त्याकामी येणारा एकूण रक्कम रु.११५ लक्ष मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.नवनाथ विश्वनाथ दारकुंडे यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**श्री. चेतन सनकत :-** माझे या विषयाला अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.४५२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, वार्षीक नाविण्यपुर्ण, नागरी दलितेत्तर, तसेच नगरोत्थान योजने अंतर्गत प्रभाग क्रं.२ मध्ये खालील नमूद विविध १ ते ५ कामे करणेस व त्याकामी येणारा एकूण रक्कम रु.११५ लक्ष मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | प्रभाग क्रं.२ कंक यांचे घरापासुन ते शिंदे यांचे घरापर्यंत रोड कॉंक्रीटींग करणे. | रु.२०,००,०००/- |
| २. | प्रभाग क्रं.२ विनायक पाटील यांचे घरापासुन ते राजु शिंदे यांचे घरापर्यंत रोड कॉंक्रीटींग करणे. | रु.२५,००,०००/ |
| ३. | प्रभाग क्रं.२ वरखडे यांचे घरापासुन ते बाळा चौधरी यांचे घरापर्यंत रोड कॉंक्रीटींग करणे. | रु.१५,००,०००/ |
| ४. | प्रभाग क्रं.२ सावंत यांचे घरापासुन ते मधु मांहागडे यांचे घरापर्यंत रोड कॉंक्रीटींग करणे. | रु.२५,००,०००/ |

| | | |
|---|---|---|
| ५. | प्रभाग क्रं.२ पालतकर चक्की पासुन ते बागवान व वसंत शिंदे यांचे घरापर्यंत रोड कॉक्रीटींग करणे. | रु.३०,००,०००/ |
| | एकूण रक्कम रुपये :- | रु.१,१५,००,०००/ |

प्रशासनाने सदर कामांसाठी लागणारा निधीबाबतचा प्रस्ताव शासनाचे नगरविकास विभागाकडेस सादर करावेत. सदर कामांसाठी नगरविकास विभागाकडुन प्रत्यक्ष निधी प्राप्त झाल्यावर ती कामे हातात घ्यावी व वार्षीक योजने अंतरगत जिल्हा नियोजन मंडळातुन मिळणारे वार्षीक अनुदानातुन शहरातील प्रत्येक वार्डात समसमान वाटप करण्यात यावा.

प्रशासनाने सदर प्रकरणी आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५९ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील कुलभुषण विरभान**

**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ५२)** प्र.क्र.१५ मध्ये दलित्तेतर वस्ती सुधारणा निधी अंतर्गत विविध १ ते ८ कामे करणे व त्याकामी येणारा एकूण रक्कम रु.३ कोटी ३० लक्ष मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.प्रशांत सुरेश नाईक यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**श्री. चेतन सनकत :-** माझे या विषयाला अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.४५३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका प्रभाग क्रं.१५ मधील खालील नमुद कामे नागरीकांना विविध सोईसुविधा पुरविणे, रहदारीस व वाहतुकीची सेवा उपलब्ध करणे कामी करुन घेणे गरजेचे असून याबाबत सदर परिसरातील नागरीकांकडून सदर कामांना त्वरीत करणेबाबत वारंवार मागणी होत असल्यामुळे प्र.क्र.१५ मध्ये दलित्तेतर वस्ती सुधारणा निधी अंतर्गत खालील नमूद विविध १ ते ८ कामे करणेस व त्याकामी येणारा एकूण रक्कम रु.३ कोटी ३० लक्ष मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | प्रभाग क्रं.१५ मेहरुण अंतर्गत महादेव मंदिर ते मिल्लत शाळा पुलापर्यंत नाल्यास (पश्चिमेकडील बाजुस) संरक्षण भिंत बांधणे. | रु.७०,००,०००/- |
| २. | प्रभाग क्रं.१५ मेहरुण अंतर्गत मिल्लत शाळेसमोरील नाल्यास संरक्षण भिंत बांधणे व स्लॅब टाकणे. | रु.५०,००,०००/ |
| ३. | प्रभाग क्रं.१५ मेहरुण अंतर्गत त्रिवेणी माता मंदिराजवळ पूल बांधणे. | रु.२०,००,०००/ |
| ४. | प्रभाग क्रं.१५ मेहरुण अंतर्गत मलिक नगर नाल्यावरील पुला अंतर्गतच्या नाल्याच्या भागास संरक्षण भिंत बांधणे. | रु.५०,००,०००/ |
| ५. | प्रभाग क्रं.१५ मेहरुण अंतर्गत कुंभारवाडा सार्व.शौचालय ते त्रिवेणी माता मंदिरा पर्यंत नाल्यास संरक्षण भिंत बांधणे. | रु.५०,००,०००/ |
| ६. | प्रभाग क्रं.१५ मेहरुण अंतर्गत कुंभारवाडा येथील महिला व पुरुषांच्या सार्व. शौचालय बांधणे. | रु.४०,००,०००/ |
| ७. | प्रभाग क्रं.१५ मेहरुण अंतर्गत लक्ष्मी नगर येथिल नाल्यास संरक्षण भिंत बांधणे. | रु.२०,००,०००/ |
| ८. | प्रभाग क्रं.१५ मेहरुण अंतर्गत मिल्लत हायस्कुल जवळील नाल्यावर पुल बांधुन ॲप्रोच रस्ता तयार करणे. | रु.३०,००,०००/ |
| | एकूण रक्कम रुपये :- | रु.३,३०,००,०००/ |

प्रशासनाने सदर कामांसाठी लागणारा निधीबाबतचा प्रस्ताव शासनाचे नगरविकास विभागाकडेस सादर करावेत. सदर कामांसाठी नगरविकास विभागाकडुन प्रत्यक्ष निधी प्राप्त झाल्यावर ती कामे हातात घ्यावी व वार्षीक योजने अंतर्गत जिल्हा नियोजन मंडळातुन मिळणारे वार्षीक अनुदानातुन शहरातील प्रत्येक वार्डात समसमान वाटप करण्यात यावा.

प्रशासनाने सदर प्रकरणी आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५९ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील कुलभुषण विरभान**

**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ५३)** प्र.क्र.१८ मेहरुण अंतर्गत नागोरी डेअरी ते नॅशनल हायवे पर्यंत आर.सी.सी.गटार व स्लॅब कल्व्हेट बांधणे व त्याकामी येणारा एकूण रक्कम रु.१४,७४,४६३/- सन्मा.सदस्या, सईदा बी शेख युसुफ यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**श्री. चेतन सनकत :-** माझे या विषयाला अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ४५४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्र.क्र.१८ मेहरुण अंतर्गत नागोरी डेअरी ते नॅशनल हायवे पर्यंत आर.सी.सी.गटार व स्लॅब कल्व्हेट बांधणे व त्याकामी येणारा अंदाजीत रक्कम रु.१४,७४,४६३/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर कामांसाठी लागणारा निधीबाबतचा प्रस्ताव शासनाचे नगरविकास विभागाकडेस सादर करावेत. सदर कामांसाठी नगरविकास विभागाकडुन प्रत्यक्ष निधी प्राप्त झाल्यावर ती कामे हातात घ्यावी व वार्षीक योजने अंतर्गत जिल्हा नियोजन मंडळातुन मिळणारे वार्षीक अनुदानातुन शहरातील प्रत्येक वार्डात समसमान वाटप करण्यात यावा.

प्रशासनाने सदर प्रकरणी आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५९ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- पाटील कुलभुषण विरभान**

**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**नगरसचिव :- विषय क्रं:- ५४)** महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान निधी अंतर्गत ४२ कोटी मात्रचे कामासंदर्भात मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपिठात स्थगिती संदर्भात याचिका दाखल करणे व दाद मागणेसाठीचे अधिकार सभागृहातील कोणत्याही सन्मा.सदस्य/सदस्यांना प्रदान करणेबाबत सन्मा.सदस्या, ॲड.सौ.शुचिता अतुलसिंह हाडा यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौर महोदया , सदर कामी खंडपीठात याचिका दाखल करणे आणि दाद मागणेचे अधिकार सन्मा.सभापती स्थायी समिती श्री.राजेंद्र घुगे पाटील आणि ॲड. श्री.दिलीप पोकळे यांना प्रदान करण्यात यावे.

**नगरसचिव :-** रियाजभाई मंजुर आहेना

**श्री.रियाज बागवान :-** होय मंजुर आहे.

**नगरसचिव :-** अनुमोदक कोण आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** माझे अनुमोदन आहे.

**सुन्नाबी देशमुख :-** हॅलो महापौर साहेबा, हॅलो.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.४५५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान निधी अंतर्गतचे ४२ कोटींचे कामांना राज्य शासनाने पुनश्च एकदा स्थगिती दिलेली आहे. सदर कामी प्रशासकिय पाठपुरावा करुन

मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपिठात स्थगिती संदर्भात दाद मागणे व त्यासाठीचे येणाऱ्या खर्चास मंजुरी बाबत यापूर्वीच महासभा ठराव क्रं.३५७ दिनांक १६/१२/२०२० अन्वये पुर्वीच ठराव पारित करण्यात आलेला आहे मात्र प्रशासन सदर कामी याचिका दाखल करेल असे दिसत नाही.

जळगांव शहरातील विकास कामांचा अनुशेष पाहता उपरोक्त स्थगिती ताबडतोब उठवुन सदर निधी महानगरपालिकेस सत्वर मिळवुन सदरील कामे सुरु करणे अत्यावश्यक आहे. तरी मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपिठात सदरील स्थगिती संदर्भात याचिका दाखल करणे व दाद मागणेसाठीचे अधिकार म.न.पा.सभागृहातील स्थायी समिती सभापती, श्री.राजेंद्र झिपरु पाटील व सन्मा.सदस्य, श्री.दिलीप बबनराव पोकळे यांना देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन घेऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५९ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- ॲड. हाडा शुचिता अतुलसिंह**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**मा.महापौर :-** सभा संपलेली असल्याने नगरसचिव यांनी राष्ट्रगीत सुरु करावे.

**नगरसचिव :**- सर्व सन्मा.सदस्यांनी राष्ट्रगीतसाठी उभे राहावे ही विनंती.

**राष्ट्रगीत झाल्यानंतर सभा संपन्न झाली.**

**सही/-**

**(भारती कैलास सोनवणे)**

**महापौर**

**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव**